रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २५२ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

## ठेकेदारांमुळे रस्त्याचे काम रखडले



पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ शुक्रवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## जिल्ह्यात ४७ रुग्ण; दोन रुग्णांचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात गुरुवार दि. १७ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या ४७ नव्या रुग्णांची नोंद झाली असून उपचारादरम्यान आज दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तीन तालुक्यात आज एकाही नवीन रुग्णाची नोंद झालेली नाही. तर दिवसभरात १०७ रुग्ण कोरोनामुक्त झाले अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.गुरुवारी पनवेल महापालिका हद्दीत १२, पनवेल ग्रामीण ५, खालापूर ६, कर्जत २, पेण ४, अलिबाग ५, माणगाव २, रोहा ३, सुधागड १, तळा १,श्रीवर्धन ३, म्हसळा १, महाड २ असे ६९ रुग्ण आढळले.

### अलिबागमध्ये रायगडातील शिवसेनेचे आमदार एकवटले

# पालकमंत्री हटाव मोहीम

*। अलिबाग । विशेष प्रतिनिधी । पालकमंत्री अदिती तटकरे यांच्याकडून रायगड जिल्ह्यातील शिवसेनेच्या आमदारांसह सर्व कार्यकर्त्यांची गळचेपी होत असल्याने संतप्त शिवसेनेच्या आमदारांनी सुरु केलेली पालकमंत्री हटाव मोहीम आता आणखी तीव्र झाली आहे. गुरुवारी (दि.१७) अलिबागमध्ये जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत जोरदार शक्तीप्रदर्शन करीत शिवसेनेच्या मुळावर उठलेल्या पालकमंत्री अदिती तटकरे यांना हटविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही अशी गर्जना शिवसेनेच्या तिन्ही आमदार आणि जिल्हाप्रमुखांनी एकमुखांनी केली. या बैठकीनंतर महाविकास आघाडीतील दोन प्रमुख घटक पक्ष असलेल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षातील मतभेद टोकाला पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.*




शिवसेनेचे आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेंद्र दळवी यांच्या सह जिल्हा परिषद विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार तुकाराम सुर्वे, अनिल नवगणे आदी उपस्थित होते. या बैठकीत सर्व नेत्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे आणि पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर जोरदार टिका केली. आमदार भरत गोगावले म्हणाले की, आपण जो लढा हातात घेतला आहे तो आता पूर्ण करु या आणि रायगडला आणि शिवसेनेला न्याय देण्याचा प्रयत्न करु या. यांची मक्तेदारी कुठेतरी थांबवू. आमदार भास्कर जाधव यांनी तटकरेंविरोधात आरोपांची जी जंत्री वाचली त्यातला एक शब्दही ते खोडू शकले नाहीत. त्यामुळे अधिक पान २ वर

# शिवसेना नेते सुधीर जोशी यांचे निधन

। मुंबई । वृत्तसंस्था ।

ज्येष्ठ शिवसेना नेते सुधीर जोशी (वय ८१) यांचे गुरुवारी निधन झाले. जोशी यांना कोरोनाची बाधा झाली होती. त्यांच्यावर मुंबईतल्या जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते.



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत जवळचे सहकारी होते. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सुधीर जोशी यांच्या निधनाबद्दल शोक प्रकट केला आहे. त्यांनी मुंबईचा महापौर ते महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्रीपद त्यांनी भूषवले होते. आजारपणामुळे त्यांनी १९९९ मध्ये सक्रीय राजकारणातून निवृत्ती घेतली.त्यांचे मुळ गाव नांदवी,ता.श्रीवर्धन हे होते.पण संपूर्ण कारकिर्द ही मुंबईतच गेली. शिवसेनेच्या स्थापनेपासून बाळासाहेबांसोबत काम करत असलेले सुधीर जोशी १९७३ मध्ये मुंबईचे महापौर झाले. पुढे पदवीधर मतदारसंघाचे पहिले आमदार, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आणि राज्याचे शिक्षणमंत्री ही पदेही त्यांनी भूषवली आहेत.

सुधीरभाऊ -रायगडशी नाळ जुळलेला नेता -पान ३

## महत्त्वाचे

### वाघाच्या हल्ल्यात एकाचा बळी

**चंद्रपूर :** चंद्रपूर वीज केंद्र परिसरातून मध्यरात्री वाजताच्या सुमारास भोजराज मेश्राम या कामगाराला वाघाने उचलून नेले. त्यामुळे या परिसरात भीती व दहशतीचे वातावरण आहे. दरम्यान गुरुवारी सकाळी कामगाराचा मृतदेह मिळाला आहे. या हल्ल्यात त्याचे डोके धडावेगळे झाले आहे. दोन दिवसापासून या भागात वाघ फिरत आहे. वीज केंद्राने याची माहिती वनखात्याला दिली होती. दरम्यान वनखात्याने बंदोबस्त करण्यापूर्वीच वाघाने कामगाराचा बळी घेतला. त्या व्यक्तीची सायकल रस्त्यावर पडलेली दिसली, गेट नंबर १३ जवळ ही घटना घडली आहे.

### हिंदूस्थानी भाऊला जामीन मंजूर

**मुंबई :** दहावी-बारावीचे विद्यार्थ्यांना आंदोलनासाठी भडकवल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या हिंदुस्थानी भाऊ उर्फ विकास पाठकला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. आता हिंदुस्तानी भाऊला मुंबई सत्र न्यायालयातून जामीन मंजूर केला आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा ऑफलाईन घेण्याच्या मागणीसाठी विद्यार्थांना चिथावल्याबद्दल फाटक याला १ रोजी अटक करण्यात आली होती.

### अपघातात दोन मित्र ठार

**जळगाव :** मोटरसायकल पंक्चर झाल्यानंतर दुरुस्तीसाठी घेऊन जात असताना कारने दिलेल्या धडकेत दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. अमोल दीपक सोनवणे (वय १५ रा. यशवंत नगर, भडगाव ) आणि त्याचा मित्र पंकज भारत भोई (रा. भोईवाडा, भडगाव ) अशी मृत मुलांची नावे आहेत. बुधवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास भडगाव ग्रामीण रुग्णालयासमोर हा अपघात झाला.

## बी.जी. पाटील यांचे उपोषण स्थगित



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अधिपरिचारिकांना नियमाप्रमाणे १८ महिन्यांची शासकिय नियुक्ती मिळावी या मागणीसाठी समाज क्रांती आघाडी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष बी.जी. पाटील यांनी मंगळवारपासून येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेले बेमुदत पान २ वर

### मोदी सरकारमुळे

## देशाची घडी विस्कटली

**माजी पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंह यांचा घणाघात**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केंद्रातील मोदी सरकारच्या धोरणांमुळे देशाची आर्थिक, सामाजिक स्थिती, विदेश निती बिघडली असून भाजपाचा राष्ट्रवाद हा इंग्रजांच्या 'फोडा आणि राज्य करा या धोरणावर आधारीत आहे. या सरकारच्या काळात घटनात्मक संस्था दुर्बल केला जात असल्याचा आरोप माजी पंतप्रधान मनमोहनसिंह यांनी केला आहे.



> गेली साडेसात वर्षे सरकार चालवल्यावर स्वतःच्या चुका कबुल करायला हे सरकार तयार नाही. उलट हे सरकार पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांना दोष देत आहे. इतिहासावर दोष ढकलत स्वतःच्या चुका या काही कमी होऊ शकत नाहीत. पंतप्रधान म्हणून मी बोलण्यापेक्षा कामावर भर दिला.
> – मनमोहनसिंग, माजी पंतप्रधान

पंजाब विधानसभा पान २ वर




## पहिली वॉटर टॅक्सीसेवा सुरू

। उरण । वार्ताहर ।

नवी मुंबई ते मुंबईला जोडणाऱ्या देशातील पहिल्या वॉटर टॅक्सी सेवेचा लोकार्पण गुरुवारी (दि.१७) झाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि केंद्रीय मंत्री सरबानंद सोनोवाल हे या सोहळ्याला ऑनलाईन उपस्थित होते. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, मंत्री अस्लम शेख, राज्यमंत्री अब्दुल सत्तार, भाजप आमदार मंदा म्हात्रे, खासदार राजन विचारे या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित होते. पान २ वर



बेलापूर ते मुंबई सेवा




## 'हिजाबवाद' चिघळला



। कर्नाटक । वृत्तसंस्था ।

कर्नाटकात सुरू असलेल्या हिजाब वादाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी हुबळी-धारवाडात कलम १४४ लागू केला आहे. हा आदेश २८ फेब्रुवारीपर्यंत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये लागू राहणार आहे. नऊ जिल्ह्यांमध्ये हा आदेश लागू करण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून कर्नाटकात हिजाबवर बंदी घालण्यावरून वाद सुरू झाला आहे. इतकेच नाही तर गेल्या तीन-चार दिवसांपासून या प्रकरणी उच्च न्यायालयात सुनावणीही सुरु आहे. मात्र, यावर अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. या प्रकरणावर आजही कर्नाटक उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

## परीक्षा पुढे ढकलली

। मुंबई । वृत्तसंस्था ।

मास्टर्स ऑफ डेंटल सर्जरी किंवा नीट-एमडीएससाठी राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षेला मुदतवाढ देण्यात आली आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने नीट - एमडीएस २०२२ ची तारीख ४-६ आठवड्यांनी पुढे ढकलली असून एमडीएस अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेसाठी अनिवार्य रोटेटिंग इंटर्नशिप पूर्ण करण्याची तारीख ३१ मार्च ऐवजी ३१ जुलै निश्चित करण्यात आली आहे.



**अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१८ फेब्रुवारी**

१) श्रीम. शुभदा मंजुरे
१८-०२-१९४८
अलिबाग,

**म ह त्वा चे**

### सकल मराठा समाजाची बैठक

**। पनवेल । वार्ताहर ।**

मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी छत्रपती संभाजीराजे स्वतः २६ तारखेला आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करण्यासाठी बसणार आहेत. रायगड जिल्ह्यातून जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्यासाठी तयारी करण्यासाठी रायगड जिल्ह्याची बैठक रविवारी (दि.२०) सकाळी ११ वाजता मराठा समाज हॉल, पेण-खोपोली बायपास रोड आंबेगाव, पेण येथे होणार आहे.

### रोहिदास महाराजांची जयंती साजरी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

संत शिरोमणी श्री रोहिदास महाराजांची जयंती बुधवारी (दि.१६) ज्येष्ठ नागरिक सभागृह शास्त्री येथे संपन्न झाली. सकाळी रोहिदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करीत अल्पोपहार ठेवण्यात आला होता. याप्रसंगी ज्येष्ठ नगरसेवक मोहन औसरमल, कैलास गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विशाल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाली बसस्थानक इमारत पुनर्बांधणीला मुहूर्त मिळेना

## ठेकेदाराला हवी वाढीव रक्कम

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील जीर्ण आणि जर्जर झालेल्या बसस्थानकाची इमारत जवळपास वर्षभरापूर्वी पाडण्यात आली आहे. मात्र त्या ठिकाणी नवीन इमारतीच्या पुनर्बांधणीस व नूतनीकरणास अजूनही सुरुवात झालेली नाही. येथे जणूकाही खंडर झाले आहे. इमारत बांधणी व स्थानकात नुतनीकरण कामांसाठी तब्बल २ कोटी ३६ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मात्र ठेकेदाराला चालू वाढीव दर हवे असल्याने काम खोळंबले आहे.

स्थानकाची जुनी इमारत पाडली खरी, मात्र जुन्या इमारतीचा राडारोडा येथे तसाच ठेवण्यात आलेला आहे. बाजूला तात्पुरत्या स्वरूपात प्रवाशी व कर्मचारी शेड बांधण्यात आली आहे. मात्र परिपूर्ण बसस्थानक इमारती अभावी प्रवासी व परिवहन कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे. अनेक वर्षे धोकादायक स्थितीतल्या बस स्थानकाची इमारत तोडून त्याठिकाणी नवीन इमारत उभी रहावी यासाठी लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार राज्य परिवहन महामंडळाकडे मागणी करण्यात येत होती. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, नागरिकांकडून उपोषणे व आंदोलने देखील करण्यात आली.



> उपोषणांतर रायगड परिवहन विभागीय नियंत्रक यांच्याकडून बसस्थानकाचे तात्काळ पुनर्बांधणीचे लेखी पत्र देण्यात आले होते. परंतु एक वर्ष उलटून गेले तरीही कोणत्याच कामाला सुरुवात झालेली नाही. पुढील महिन्यात पुन्हा मी आमरण उपोषणास बसणार आहे. बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू होईपर्यंत हे उपोषण सुरू ठेवण्यात येणार आहे.
> – रवींद्रनाथ ओव्हाळ, आंदोलनकर्ते व रिपाई रायगड जिल्हा सचिव

> ठेकेदाराने तात्पुरते बसस्थानक बांधून दिले. मात्र नंतर कोरोना काळात ठेकेदाराने नवीन बसस्थानकाचे काम सुरू केलेले नाही. त्यामुळे त्याच्याविरुद्ध आम्ही कारवाई सुरू केलेली आहे. तसेच आता ठेकेदाराला चालू वाढीव दर हवे असल्याने काम सुरू झालेले नाही. भाववाढ मिळण्यासंदर्भात आम्ही प्रस्ताव शासनाकडे पाठवत आहोत. ठेकेदार काढल्यास नवीन टेंडर काढून दुसरा ठेकेदार निवडण्यात येईल.
> – विद्या भिलारकर, कार्यकारी अभियंता (एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर), परिवहन महामंडळ, मुंबई.

# तळावासिय मुबलक पाण्याच्या प्रतिक्षेत

## पाणी योजनेवरून श्रेयवादाचे राजकारण

**। तळा । वार्ताहर ।**

पाणी हा मानवी जीवनातील महत्वाचा घटक मानला जातो. शरीरासाठी पाणी किती उपयुक्त आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु तळा शहरातील नागरिक अजूनही मुबलक पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

तळा ग्रामपंचायत असताना शहरातील ग्रामस्थांना भेडसावत असलेला पाण्याचा प्रश्न तळा नगरपंचायत झाल्यानंतरही कायम आहे. पाण्याची योग्य सुविधा नसल्याने शहरातील सुशिक्षित नोकरदारवर्ग इंदापूर, माणगाव, रोहा आदी ठिकाणी राहायला गेले आहेत व याचा परिणाम शहरातील बाजारपेठेवर झाला आहे. दोन वर्षे झाली तरी नगरपंचायतीला मुख्याधिकारी मिळाला नसल्याने पाण्याचा प्रश्न दूरच इतर विकास कामे देखील रखडली होती. जवळपास दोन वर्षांच्या कालावधीनंतर नगरपंचायतीत मुख्याधिकारी उपस्थित झाल्याने हळूहळू शहरातील विकासकामे मार्गी लागताना दिसत होती. यावेळी शहरातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी देखील हालचाली सुरू झाल्या.

तळा शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी पाटबंधारे विभाग यांच्याकडे तालुक्यातील वावे धरणातील पाणी आरक्षित करण्यात यावे, यासाठी निवेदन देण्यात आले होते व त्याला मंजुरी देखील मिळाली होती. परंतु जसजशी तळा नगरपंचायतीची निवडणूक जवळ येऊ लागली तसतशी पाणी योजनेच्या श्रेय वादावरून सर्वच राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा सुरू झाली. शेवटी तर तळा शहराची पाणी योजना आम्हीच मंजूर केली म्हणून शहरातील नाक्यावर बॅनर देखील झळकले. मात्र प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे अद्यापही तळा शहरातील नागरिक मुबलक पाण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

> शहरातील नागरिकांना वेळच्या वेळी सुरळीत पाणीपुरवठा कसा करता येईल यासाठी नियोजन असणार आहे. पाणी योजना फक्त मंजूर करून चालत नाही, तर त्याची वर्क ऑर्डर महत्वाची आहे. तळा शहराची पाणी योजना पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून पूर्ण करून दाखवू.
> – चंद्रकांत रोडे, नगराध्यक्ष



# महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**। पेण । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते प्रसाद भोईर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिहू ग्रामपंचायतीमध्ये महाआरोग्य शिबीराचे आयोजन केले आहे.

हे शिबीर १८ फेब्रुवारी व १९ फेब्रुवारी २०२२ रोजी होणार असून यामध्ये १८ फेब्रुवारी रोजी जनरल ओपीडी रोगांवरचे मोफत निदान शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्यास त्यासंबंधी मोफत मार्गदर्शन व फॉलोअप, जनरल रोगांवरची मोफत औषधे, मोफत ईसीजी, ब्लड शुगर, बीपी तपासणी तसेच १९ फेब्रुवारी रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया फॉलोअप सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत होणार आहे.

गेली दोन वर्ष कोव्हिडच्या महामारीने सर्वांनाच हैराण केलेले असतानाच प्रसाद भोईर यांच्यासारख्या युवा नेत्याने शिहू विभागाला मोलाचा आधार दिला आहे. कोणत्याही सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य समस्यांवर प्रसार भोईर सर्वसामान्यांच्या मदतीला उभे राहत आहेत. हे आरोग्य शिबीर देखील एक त्याचाच भाग असून या आरोग्य शिबीरासाठी जेएसडब्ल्यू, संजीवनी हॉस्पिटल व प्रयास हॉस्पिटल संयुक्तपणे मदत करणार आहेत.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-दूरशेत ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| अनुसया गोपाळ तिडके<br>इंदिरा चंद्रकांत हेलवंडे<br>वैशाली शरद पाटील<br>सोनाली कृष्णा क्षत्रीय<br>दत्ता गोपाळ तिडके | ३० | - | १४-२७-०० यापैकी १४ एकर | ६=६० |

तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून मी सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करेन. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- १८-०२-२०२२

खरेदीदार
**सुनिल पांडुरंग भोईर**
पत्ता- गाव शिरसे, पो. कोंदिवडे
ता.कर्जत, जि.रायगड मो.९७६५५७७२२३


# कामोठेतील समस्या सोडवण्याची मागणी

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

कामोठे नोडचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन कामोठेतील समस्या सोडविण्याची मागणी संतोष चिखलकर उपाध्यक्ष-पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटी यांच्यातर्फे करण्यात आली आहे.

सेक्टर ६ ते १० मधील वाहणाऱ्या गटारांची त्वरित कारवाई करण्यासोबत नवीन गटार लाईन टाकण्याचा प्रस्ताव पास करणे, सेक्टर १८ मधील सिडकोचा राखीव प्लॉट आहे त्याची साफसफाई करून नागरिकांना मॉर्निंग वॉल्क तसेच इतर शारिरिक व्यायामासाठी उपलब्ध करून देणे या आदी कामोठे शहरातील समस्यांबाबत रीतसर चर्चा करण्यात करून त्याबाबत लवकरात लवकर उपायोजना करण्याची विनंती करण्यात आली. यावेळी पोपट आवारी, रवींद्र जाधव, प्रमोद पेंडुरकर, काकासाहेब पवार उपस्थित होते.



# अलिबाग पर्यटन वाढीसाठी शिंदेशाही पुढे सरसावली

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग से आया हे क्या? असं बोलणाऱ्यांना चपराक देण्यासाठी आता शिंदेशाही पूढे सरसावली आहे. कैक मराठी कलाकार अलिबागला येऊन चित्रीकरण करीत आहेत. त्यातच अलिबागच्या पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी शिंदेशाहीचा वारसा पुढे नेणारे बिग बॉस ३ फेम मास्टरमाईंड डॉ. उत्कर्ष शिंदे यांनी अलिबागचे सौंदर्य, समुद्र किनारे, किल्ले इत्यादीवर आधारित एक मस्तीने भरलेल गाणे तयार केले आहे. यामधून अलिबागच्या पर्यटनात अधिक वाढ होणार असल्याचा विश्वास उत्कर्ष शिंदे यांनी व्यक्त केला.

तालुक्याला लाभलेला निसर्गरम्य असा समुद्रकिनारा व इकडचे अलौकिक सौंदर्य 'अलिबाग फिराया जाऊ या' गाण्याची निर्मिती बिग बॉस मराठी-३ फेम उत्कर्ष शिंदे यांनी केली आहे. उत्कर्षाने हे गाणे लिहून संगीतबद्ध केले आहे. या गाण्याच्या माध्यमातून अलिबागचे नैसर्गिक सौंदर्य प्रत्येक माणसाच्या मनात रुजावे यासाठी उत्कर्ष शिंदे यांनी गाण्याची निर्मिती केली आहे. सोशल मीडिया पेजवर उत्कर्ष शिंदे नव्या कार्यक्रमात नव्या गाण्यात तर काही चित्रपटातही झळकणार असल्याच्या पोस्ट शेअर करण्यात आल्या आहेत. या पोस्टना आपल्या इन्स्टा स्टोरीमध्ये मेन्शन करत, उत्कर्षाने हे मान्य केले आहे. की तो लवकरच आपल्या भेटीला येत आहे.

# आ.गोगावले यांनी मानले मंत्री विजय वडेट्टीवार यांचे आभार

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड व पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गावांच्या पुनर्वसनासाठी १३ कोटी २५ लक्ष मंजूर झाल्याबद्दल आ.भरत गोगावले यांनी गुरुवारी मंत्रालयात मंत्री विजय वडेट्टीवार यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे आभार मानले. त्यावेळी मंत्रालयातील त्यांच्या दालनात इतर आमदार देखील उपस्थित होते

दिनांक २२ व २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे महाड-पोलादपूर तालुक्यातील तळीये कोंढाळकर वाडी, बौद्धवाडी, मौजे केवनाळे साखर (सुतारवाडी) ही गावे बाधित झाली होती. तसेच मनुष्यहानी देखील झाली होती. दरड कोसळून बाधित झालेल्या नागरिकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याची बाब शासनाच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्याच अनुषंगाने या गावांच्या कायमस्वरूपी पुनर्वसन करिता भूसंपादन तसेच नागरी व सार्वजनिक सोयी सुविधा, विद्युत पुरवठा तसेच जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा करणे कामांकरिता १३ कोटी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# काशीद येथील खून प्रकरणातील आरोपी गजाआड

## एकास पोलीस कोठडी; दुसऱ्या आरोपीची रवानगी बाल सुधारगृहात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील काशीद या ठिकाणी काही दिवसापूर्वी एक मृतदेह विहिरीत तरंगताना आढळून आला होता. सदरील मृतदेहाची तपासणी केल्यावर सदरचा खून असल्याची मुरुड पोलिसांची खात्री पटल्यावर अज्ञात व्यक्तीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मुरुड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन गवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सचिन वाणी यांच्या समवेत पोलीस हवालदार संतोष पाटील, पोलीस नाईक सुरेश वाघमारे यांनी या प्रकरणात महत्वपूर्ण भूमिका बजावत आरोपींना शोधण्याचा प्रयत्न केला. सदरील प्रकरण मुरुड पोलिसांनी केवळ २४ तासाच्या आत उघड करून आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

पोलिसांचे माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास मयत व्यक्ती हा काशीद येथील आदिवासी वाडीवर त्याच्या मित्राकडे दारू पिण्यासाठी गेला होता. यावेळी तिथे आरोपी गौरव नंदू वाघमारे, मंथन महेंद्र पवार यांच्यामध्ये जोरदार भांडण झाले होते. दारूच्या नशेत मयत विनोद कुमार हा सुद्धा वाद घालू लागला. या दोघांनी विनोदला पट्ट्याने व हाथा बुक्याने मारहाण केली. मानेवर पाय देऊन त्याला ठार मारल्यावर त्याचा मृतदेहाला पाईपला बांधून विहिरीत ढकलून दिला. सदरची घटना पोलिसांच्या समोर आल्यावर आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांना न्यायालयात हजर केले असता यातील आरोपी गौरव वाघमारे याला १८ फेब्रुवारी पर्यंत पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. तर दुसरा आरोपी मंथन पवार याचे वय १८ पेक्षा कमी असल्याने त्याची कर्जत येथील बाल सुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे. सदरील प्रकरणातील आरोपी शोधण्याकामी काशीद येथील ग्रामस्थांचे उत्तम सहकार्य लाभले आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग. मोबाईल : ९८६०६५८५६५**


**पान १ वरून**

## पालकमंत्री हटाव मोहीम

काही सांगण्याची गरज नाही. तुमच्यावर जो अन्याय झाला आहे तोच आमच्यावर आणि आमच्यावर झालेला अन्याय तुमच्यावर झाला आहे. शिवसेनेचे बाळासाहेबांचे आपण शिलेदार आहोत. आता जे होईल ते जाईल. आता हा पालकमंत्री आपल्याला नको आहे. शिवसेनेचा कोणीही पालकमंत्री द्यावा आम्ही त्याचा स्विकार करु. या पालकमंत्र्यांना महाराष्ट्रात कुठेही न्यावे आमचे काही म्हणणे नाही. शिवसेनेच्या मंत्र्यांच्या माध्यमातून आम्ही मंजूर करुन आणलेली कामे आपणच केल्याचा खोटा दावा करण्याच्या कामा पलिकडे पालकमंत्री काहीच करीत नाहीत. पालकमंत्री तुम्ही खासदार तुम्ही म्हणजे साऱ्या कामाचे श्रेय तुमचे? आघाडीच्या सरकार असताना आम्हाला बोलवायला कमीपणा का? आम्ही किती सहन करायचे याला मर्यादा आहेत. पालकमंत्र्यांचे काय करायचे ते आता आम्ही बघून घेवू. शासकीय कुठल्याही समितींना मान्यता दिली जात नाही. पंचायत समिती, जिल्हा परिषद प्रभाग रचनेत कोणालाही विश्वासात घेतले नाही. १५-१५ वर्षे पालकमंत्री असूनही यांचे दोन हून अधिक आमदार होऊ शकले नाही. आता एकच आमदार आले ते देखील राहतील की नाही हे येणारा काळच दाखवेल असा इशारा यावेळी भरत गोगावले यांनी दिला.

आमदार महेंद्र थोरवे म्हणाले की, आता खऱ्या अर्थाने रायगडला जाग आलेली आहे. भरतशेठ गोगावले यांनी माणगावमधून दिलेला आवाज बुलंद करु. दोन वर्षे आम्ही संघर्ष करीत होतो. पक्षप्रमुखांच्या आदेशाने चालत होतो. महाविकास आघाडीचे सरकार चालविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. रायगड जिल्ह्यात आमच्या मतदारसंघात काम करत असताना पालकमंत्र्यांच्या माध्यमातून वेळोवेळी अन्याय होत होते हे जाहिरपणे आम्ही सांगत होतो. प्रत्येकवेळी पक्षप्रमुखांच्या आदेशाचे पालन करण्याचे काम आम्ही तीनही आमदार प्रामाणिकपणे करत आलो होतो. मात्र आतापर्यंत पालकमंत्री आणि तटकरे यांच्याकडून शिवसेनेला आणि आमदारांना दाबवण्याचेच काम केले जात होते. त्यामुळे सामान्य शिवसैनिकांना न्याय मिळेल अशी अपेक्षा असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शब्द दिला होता की पालकमंत्री राष्ट्रवादीचा असला तरी समान न्याय मिळेल. मात्र आज कोणताही शब्द पाळला जात नाही. अन्याय सुरुच आहेत. आमदारांनी सुचवलेल्या कामांना केराची टोपली दाखविली जाते. आलेला निधी वाटपातही अन्याय पालकमंत्र्यांच्या माध्यमातून केला जात आहे. खूप सहन केले, मात्र आता अन्याय सहन करणार नाही. पालकमंत्री हटविल्याशिवाय आम्ही तीन्ही आमदार आता स्वस्थ बसणार नाही. राष्ट्रवादीच्या वल्गना ऐकल्या पण महाडच्या आमदारांना हटविण्यासाठी मायका लाल पैदा झालेला नाही. महाड काय आता श्रीवर्धनचा आमदार बदलल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. अडीच वर्षे पालकमंत्री पद दिले आता अडिच वर्षे आम्हाला द्या. आभार सुरेंद्र म्हात्रे यांनी मानले.

## पहिली वॉटर टॅक्सीसेवा सुरू

बेलापूर मधून १० ते ३० इतकी प्रवासी क्षमता असलेली ७ स्पीडबोट तसेच ५६ प्रवासी क्षमता असलेली कॅटामरान बोट सेवा देणार आहे. एकूण ८ अशा बोटी आहेत. गुरुवारपासून प्रवाशांसाठी ही वॉटर टॅक्सी सेवा सुरु केली आहे. या बोटीतून बेलापूर येथून दक्षिण मुंबईत भाऊचा धक्का या ठिकाणी जाण्यास फक्त ३० मिनिटे लागतात. आणि कॅटामरान या बोटीने प्रवास करण्यास ४० ते ५० मिनिटे लागतील.

## बी.जी. पाटील यांचे उपोषण स्थगित

उपोषण जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांच्या मध्यस्थीनंतर गुरुवारी तिसऱ्या दिवशी तात्पुरते स्थगित करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांनी गुरुवारी उपोषण स्थळी भेट देऊन बी.जी.पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यानुसार शासनस्तरावर पाठपुरावा करुन नियमानुसार उपसंचालक कार्यालयात मागण्या मांडण्याचे आश्वासन दिले. सदर अधिपरिचारीकांना नियुक्तीसाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देत उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यावर समाधान झाल्याने बी.जी. पाटील यांनी लेखी आश्वासन घेत डॉ.सुहास माने यांनी लिंबू सरबत पाजून उपोषण मागे घेतले.

आरोग्य विभागातील संबंधित शासकिय व प्रशासकिय पदाधिकारी व अधिकारी यांच्या अन्यायी भूमिकेमुळे २०१७ मध्ये प्रशिक्षणास सुरूवात केलेल्या बंधपत्रीत अधिपरिचारीका यांनी २०१९-२० मध्ये आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून उत्तीर्ण होऊनसुध्दा नियमाप्रमाणे १८ महिन्यांच्या शासकिय नियुक्ती आदेशापासून त्या गेले १० महिन्यापासून वंचित आहेत. मात्र पुणे विभागातील त्याच बॅचच्या अधिपरिचारिका यांना १८ महिन्यांचे शासकिय नियक्ती आदेश देण्यात आलेले आहेत व सन २०१६ मधिल बॅचच्या अधिपरिचारीका यांनासुध्दा नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र २०१७ मधिल १५ प्रशिक्षित अधिपरिचारीका बेरोजगारी विरोधात रायगड जिल्हा समाज क्रांती आघाडी संघटनेचे अध्यक्ष बी.जी.पाटील यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले असून जर तरीही न्याय मिळाला नाही तर पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला.

## देशाची घडी विस्कटली

निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने मनोमहन सिंह यांचा पंजाबी भाषेतला एक व्हिडीओ ट्वीट केला आहे. साधारण ९ मिनिटांच्या या व्हिडीओत मनमोहन सिंह यांनी त्यांच्या संयमी भाषेत पंतप्रधान मोदी, केंद्र सरकार आणि भाजप यांच्यावर जोरदार प्रहार केले आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या अर्थिक धोरणांवर मनमोहन सिंह यांनी टीका केली आहे. कोरोना काळात केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे आर्थिक घडी विस्कटली, बेरोजगारी वाढली आणि महागाईत वाढ झाली, यामुळे सर्वसामान्य जनता त्रासली आहे असेही ते म्हणाले.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000022282**<br>**Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-63/2021-2022.**<br>RFx e-tender for work of separation of common jumpers between 100kV Bus and Bus isolators of opposite bays at 100/22kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Rs. 1,76,389/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **18.02.2022, 17:00 Hrs. to 27.02.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.02.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.02.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# ठेकेदारांमुळे रस्त्याचे काम रखडले

## सरेभाग ग्रामस्थांची फरफट प्रांत कार्यालयासमोर उपोषण



### ... तर रास्ता रोको करु

**१२ महिन्यात रस्त्याचे काम पूर्ण करायचे होते. मात्र आत्तापर्यंत २२ महिने पूर्ण होऊनही २५ टक्के ही रस्त्याचे काम झालेले नाही. जे रस्त्याचे काम झाले आहे त्यापैकी काही रस्ता आपोआपच खाडीत सरकला आहे. याचाच अर्थ जे काम केले आहे ते पूर्णतः निकृष्ट दर्जाचे आहे. अशा ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणे गरजेचे आहे. आज आम्ही सर्व वाशी ग्रामपंचायतीचे लोकप्रतिनिधी सनदशील मार्गाने उपोषणाला बसलो आहोत. परंतु एवढे करुनही जर शासनाने आमची दखल घेतली नाही तर आम्ही वाशी नाका येथे रास्ता रोको केल्याशिवाय राहणार नाहीत. असे प्रसार माध्यमांशी बोलताना वाशी सरपंच व सदस्य यांनी सांगितले.**

**। पेण । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील वाशी -सरेभाग रस्त्याचे काम ठेकेदाराच्या दिरंगाईने रखडल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, या मागणीसाठी ग्रामस्थांच्यावतीने प्रांत कार्यालयासमोर उपोषण सुरु करण्यात आले.

वाशी ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील वाशी सरेभाग हा रस्ता प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सन २०१८ मध्ये मंजुर होवून त्या रस्त्याच्या कामाचा ठेका १८ एप्रिल मध्ये मे. व्ही.एस. कन्स्ट्रक्शन, खोपटा- उरण या कंपनीला देण्यात आलेला होता. सदरचे काम पूर्ण करण्याची मुदत १२ महिने इतकी होती. काम सुरू करून दिलेली मुदत संपून २१ महिने अधिक झाले तरीही ठेकेदाराने आत्तापर्यंत अवघे ३० टक्केच्या जवळपास इतकेच काम केलेले आहे. ठेकेदाराने आतापर्यंत केलेले काम अतिशय निकृष्ठ दर्जाचे असून, काम पूर्ण होण्यापूर्वीच हा रस्ता अनेक ठिकाणी खचला आहे.

वाशी सरेभाग येथील रस्त्याच्या कामाची लांबी ४/६५० कि.मी. इतकी आहे व हे काम करण्यास हा ठेकेदार सक्षम असल्याची खात्री न करता त्याला हे काम दिल्याचे स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या कामात दोन पुलांचा समावेश असून या ठेकेदाराने एकाही पुलाचे काम अद्याप सुरू केलेले नाही. लाकडी तरंगता साकव (पूल) तयार केला असून हा साकव सद्यस्थितीत मोडकळीस आला आहे. यावरुन रहदारी करतांना कधीही अपघात होऊन जिवीतहानी होऊ शकते. रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे व या नवीन रस्त्यावरून जाणे येणे केल्याने जुने पारंपारिक मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या याच मार्गावरून जीव धोक्यात घालून सरेभाग गावात जाणाऱ्या व येणाऱ्या ग्रामस्थांना प्रवास करावा लागत आहे. रस्ता व पुलाअभावी गेली अनेक वर्ष ग्रामस्थांना खूप मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

अधिकारी वर्गाच्या चालढकल पणाला कंटाळून वाशी ग्रामस्थांनी कोरोनाचे सर्व निबंध पाळून प्रांत कार्यालय येथे उपोषण सुरु केले आहे. यामध्ये सरपंच गोरखनाथ पाटील, सदस्य रेशमा म्हात्रे, रुपेश पाटील, नारायण म्हात्रे, जयमाला पाटील, मिनाक्षी पाटील, राजन झेमसे, परशुराम पाटील, अदी प्रमुख मंडळी उपोषणाला बसले आहेत.


# रायगडशी नाळ जुळलेला नेता

**अतुल गुळवणी**
९२७०९२५२०१

रायगडच्या राजकारणात ज्या राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर नावं कमावले त्यात शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुधीरभाऊ जोशी यांचे नावं अग्रक्रमाने घ्यावेच लागेल.रायगडच्या भूमीत जन्मलेल्या आणि येथील मातीशी नाळ जुळलेला नेता अशीच भाऊंची ओळख अखेरपर्यंत राहिली.

नांदवी, ता.श्रीवर्धन ही भाऊंची जन्मभूमी. तर मुंबई ही कर्मभूमी. नगरसेवक, महापौर, मंत्री आदी पदांबरोबरच शिवसेनेतही अनेक पदे भूषविली पण पैसा, प्रसिद्धी, पदे यांच्यामागे न लागता सुधीरभाऊ अखेरपर्यंत साधेच राहिले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत सुधीरभाऊंनी मनापासून कुठल्याही पदाची अपेक्षा न ठेवता प्रामाणिकपणे काम केले.त्यामुळे अखेरपर्यंत त्यांना शिवसेनेबरोबरच अन्य पक्षांतील नेतेमंडळी नेहमीच मान देत राहिली.मुंबई मनपाचे नगरसेवक, गटनेता, विरोधी पक्षनेता म्हणून ते राहिले. तर १९७३ मध्ये मुंबईचे महापौर झाले तेव्हा ते सर्वांत तरुण महापौर होते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते होते. तेव्हा त्यांनी राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पाची पाहणी करुन त्यासंदर्भात अहवाल निष्कर्ष पुस्तिकेद्वारे शासनाकडे सादर केला. युतीच्या सरकारात ते प्रथम महसूल मंत्री होते. नंतर शिक्षण मंत्री म्हणून कार्यरत होते. मंत्री असतानाच पुण्याहून मुंबईकडे येत असताना भाऊंच्या वाहनाला अपघात झाला आणि त्यात ते जायबंदी झाले.या अपघाताने भाऊंचे सक्रिय राजकारण तसे कमीच झाले. स्थानीय लोकाधिकार समितीची धुरा बाळासाहेब ठाकरेंनी सोपविली, ती त्यांनी समर्थपणे सांभाळली. स्वतःच्या नेतृत्वाचे उसने अवसान न आणता त्यांनी लोकाधिकार चळवळीला बळ दिले आणि या चळवळीने जे बळ धरले व यश प्राप्त केले त्यात सुधीर जोशींचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळेच स्थानीय लोकाधिकार समिती म्हणजेच सुधीर जोशी हे समीकरण पक्के झाले, त्यांच्या निधनाने शिवसेनेने एक अभ्यासू नेता गमावला आहे हे नक्की.भाऊंना आदरांजली.



## महत्त्वाचे

### अवैद्य धंद्यांवर कारवाईकडे कानाडोळा

**महाड :** शहरांमध्ये गेल्या कांही वर्षापासून रायगड जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या आदेशावरुन जुगार तसेच अन्य बेकायदेशीर धंद्यांवर कडक कारवाई करण्यात आल्याने कायदा आणि सुव्यवस्था नियंत्रणामध्ये आणण्यांत प्रशासनाला यश आले होते. परंतु गेल्या कांही दिवसामध्ये महाडसह जिल्ह्यांतील अन्य शहरांत जुगार, अवैध धंदे सुरु झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. खुले आम शहरांच्या मध्यवर्ती वसाहतीमध्ये सुरु असणाऱ्या जुगार आणि अवैध धंद्यावर का कारवाई केली जात नाही असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित झाला आहे. महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे यांनी बेकायदेशीर जुगार, मटका धंद्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

### शिवजयंतीनिमित्त महारक्तदान शिबीर

**माणगाव :** माणगाव तालुका पत्रकार संघ आणि विविध सामाजिक संघटना यांच्यावतीने यावर्षीही सलग पाचव्या वर्षी शिवजयंती निमित्त शनिवारी १९ फेब्रुवारी महारक्तदान शिबिराचे आयोजन सरलादेवी मंगल कार्यालय माणगाव येथे करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते करण्यात येणार असून हे शिबीर सकाळी १० ते सायंकाळी ४ यावेळेत सुरु राहणार आहे. तरी रक्तदात्यांनी या सामाजिक उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. हे शिबीर के.ई.एम रुग्णालय परेल मुंबई यांच्या सौजन्याने व विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना लगेचच रक्तदान केल्याचे ओळखपत्र त्याठिकाणी देण्यात येणार आहे. यावेळी राजकीय, सामाजिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### उरण कोमसाप अध्यक्षपदी मच्छिंद्र म्हात्रे

**श्रीवर्धन :** कोकण मराठी साहित्य परिषद, उरण शाखेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड रंजना केणी यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी रायगड भूषण प्रा.एल.बी. पाटील, लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे, संग्राम तोगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवीन निवडी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष- मच्छिंद्र म्हात्रे, कार्याध्यक्षा- रंजना केणी, जिल्हा प्रतिनिधी- संजय होळकर, उपाध्यक्ष-चेतन पाटील, सचिव भ.पो.म्हात्रे, खजिनदार- सुजित डाकी, मार्गदर्शक- रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील, श्रीधर पाटील, लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे, शोभा जोशी, प्रदीप मुंबईकर. या बैठकीत कार्यकारिणीने करावयाच्या कामांची रुपरेषा ठरविण्यांत आली.

# सानपाड्यातील उद्यान दुर्लक्षित



**। नवी मुंबई । वार्ताहर ।**

सानपाडा येथील कै. सिताराम मास्तर उद्यानाची दुरवस्था झाली असून, महानगरपालिकेने मैदानाच्या देखभालीकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सिडकोने हे उद्यान म्हणूनच नवी मुंबई महानगर पालिकेला हस्तांतर केले आहे. या उद्यानात सकाळी मुले, वरिष्ठ नागरिक, गर्भवती महिला, नागरिक, आजारी व्यक्ती हे योगा, व्यायाम, शतपावली करण्यासाठी, तसेच शांततेत व आनंदात वेळ घालविण्यासाठी तुर्भे ते जुईनगर परिसरातून लोक येतात. उद्यानात मैदानी खेळ खेळण्यास सक्त मनाई आहे. तरी सुद्धा या उद्यानात क्रिकेट सामने, फुटबॉल सारखे खेळ दिवसभर खेळले जातात. स्पर्धा घेतल्या जातात, स्पीकरचा वापर केला जातो, क्रिकेट व फुटबॉल वेगाने मारल्यानंतर उद्यानात बसलेल्या गर्भवती महिला, वरिष्ठ नागरिक, मुले यांना लागून जखमा होतात. शेवटी त्याचे रूपांतर भांडणात होते. खेळामुळे धूळ उडते व श्वसनाचे विकार होतात. खेळामुळे उद्यानातील लावलेल्या झाडांची मोडतोड होते. वरील गोष्टी टाळण्यासाठी सुरक्षा रक्षक ठेवण्याची गरज आहे.

# शेकापमुळे बामणगाव परिसराचा विकास

## आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन; बामणगाव ते खुटळवाडी रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रयत्नातून तालुक्यातील बामणगांव ते खुटळवाडी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली असून त्याचा शुभारंभ शेकापक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी तालुका चिटणीस अनिल शांताराम पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती संदीप घरत, अविनाश ठाकूर, मारुती ठाकूर, नरेंद्र उले, काविर सरपंच राजेंद्र म्हात्रे, सरपंच ग्रामपंचायत सदस्य लंकेश नागावकर, संतोष मानकर, विजय कुंठे यांच्यासह आदी उपस्थित होते.



यावेळी आ. जयंत पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शेकापक्षाच्या माध्यमातून बामणगाव परिसराचा सर्वांगिण विकास केला जात आहे. गावच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. सदर रस्त्याचे काम आदिवासी ठाकूर वाडीपर्यंत करुन देणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमुद केले. तरुणाईच्या कामाचे त्यांनी यावेळी आवर्जून कौतुक केले.

> अलिबाग तालुक्याच्या विकासासाठी शेकापने नेहमीच प्राधान्य दिलेले आहे. येथील जनतेला मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासनिधी आणून नियोजनबद्ध पद्धतीने विकास कामे करण्यावर आमचा नेहमीच भर राहिलेला आहे. यापुढेही हिच भूमिका कायम राहिल.
> –आ. जयंत पाटील

# विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**। पनवेल । वार्ताहर ।**

वलप, ता. पनवेल येथील शाळेला हिंदाल्को कंपनीच्यावतीने शैक्षणिक साहित्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी कंपनीचे एच.आर. हेड सुधीर मिश्रा यांच्यासह अखिलेश गुप्त, अमृत आंबुलकर, लहू रौंधळ, राजेश पाटील आदींनी भेट देऊन शाळेची पाहणी केली. शाळेचे अद्ययावत रूप सोयीसुविधा पाहून शाळेतील विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत शालेय दफ्तर, पाणी बॉटल, लेखन साहित्य, कंपास बॉक्स शैक्षणिक मदत जाहीर करून उपरोक्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचे वाटप केले. यावेळी शाळेचा शिक्षक वृंद -मुख्याध्यापक चंदनशिवे, खंदारे, कोठेकर उपस्थित होते. मुख्याध्यापकांनी मान्यवरांचा सत्कार केला.

सुधीर मिश्र यांनी शाळेबद्दल गौरावोद्गार काढताना सर्व ग्रामस्थ आणि वलप ग्रामपंचायतीचे काशिनाथ पाटील यांचे कौतुक केले.



# भूयारी मार्गाऐवजी उड्डाण पूल उभारा

**|| पोसरी ग्रा.पं.ची मागणी; रेल्वे प्रशासनाला निवेदन**


**। रसायनी । वार्ताहर ।**

कोकण रेल्वे लाईन अंतर्गत मौजे जुनी पोसरी रसायनी रेल्वे स्टेशनजवळ भुयारी मार्गाचे काम चालू केले आहे. त्याऐवजी येथे उड्डाणपूल उभारला जावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

सदर कामाचे रस्ता मार्ग हे दक्षिणकडे काढत आहेत असे निदर्शनात आले आहे. परंतु मौजे जुनी पोसरी व ठाकूरवाडी या गावांचा मार्ग उत्तरेकडे असल्याने व सदर गावाची लोकसंख्या जास्त असल्याने तसेच पोसरी गाव तुराडे गाव तसेच ठाकूरवाडी गावची शेतजमीन असल्यामुळे विकासाच्या दृष्टीने मोठी अडचण निर्माण होणार आहे. सदर नाल्याची उंचीपेक्षा १० फुट भुयारी मार्ग खाली असल्यामुळे पावसाळी जास्त प्रमाणात पाणी नाल्याने येत असल्यामुळे भुयारी मार्गात १० फुट पाणी राहील त्यामुळे सदर भुयारी मार्गाचा काहीही उपयोग होणार नाही. सदर भुयारी मार्ग रद्द करून उड्डाणपूल बांधून मिळावे त्यामुळे ग्रामस्थांचा मार्ग सुरक्षित होईल असा इशारा ग्रुप ग्रामपंचायत पोसरी यांच्यावतीने रेल्वे मंत्रालय सदस्य अभिजित पाटील यांना दिला आहे. यावेळी अरविंद पाटील, गणेश थोरवे, महादेव देसाई उपस्थित होते.



# स्मार्ट टीव्हीचे उद्घाटन



**। उरण । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोठीजुई येथे शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या स्मार्ट टीव्हीचे उद्घाटन विस्तारा अधिकारी प्रियंका पाटील, केंद्रप्रमुख टी.जी म्हात्रे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी पुरुषोत्तम भोईर तृप्ती बंडा, मुख्याध्यापक सुभाष म्हात्रे, रंजना म्हात्रे, संजय होळकर, दर्शन पाटील, संदीप गावंड, शर्मिला पाटील, यतीन म्हात्रे, ज्योती बामणकर व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

## पाली स्वीकृत नगरसेवकपदी

# राष्ट्रवादीचे मोरे, शेकापचे सुमेध खैरे




**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

पाली नगरपंचायतीच्या पहिल्या विशेष सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर मोरे व शेकापचे सुमेध खैरे यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून निवड करण्यात आली आहे.

पाली नगरपंचायतीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ६, शेकापचे ४, शिवसेना ४, भाजप २ व अपक्ष १ असे एकूण १७ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे एका स्वीकृत नगराध्यक्ष निवडीसाठी शेकाप व शिवसेनेचे समसमान नगरसेवक असल्याने चुरस होती. मात्र एका अपक्ष नगरसेवकाने शेकापला पाठींबा दिल्याने शेकापचे पारडे जड झाले आणि शेकापला स्वीकृत नगरसेवक पद मिळाले. यावेळी नगराध्यक्षा गीता पालरेचा, उपनगराध्यक्ष आरिफ मणियार, जिप सदस्य सुरेश खैरे, ग. रा. म्हात्रे सर्व नगरसेवक, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उपसरपंचपदी अस्मिता गावंड



**। उरण । वार्ताहर ।**

ग्रुप ग्रामपंचायत पिरकोन उपसरपंचपदी अस्मिता गावंड यांची बिनविरोध निवड झाली आहे. ग्रामपंचायतवर शेतकरी कामगार पक्ष व काँग्रेसची सत्ता आहे. शेकाप व काँग्रेसची युती आहे. उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे, विजय भोईर, रेखा घरत, सरपंच रमाकांत जोशी आदी उपस्थित होते.

# जेएसडब्ल्यूकडून कांदळवनाची तोड

**। पेण । वार्ताहर ।**

जेएसडब्ल्यू कंपनीने अनधिकृतरित्या केलेल्या कांदळवनांची पाहणी करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या दौऱ्याकडे तहसिल कार्यालयाने पाठ फिरविल्याने हा दौराच रद्द करावा लागाल.

याबाबतची तक्रार तुषार मानकवळे यांनी केली होती. त्या अनुशंगान वन क्षेत्रपाळ एस.एस.डूंबरे यांनी संयुक्तपणे तहसिल, भूमिअभिलेख, पोलिस, जेएसडब्ल्यू कंपनीचे अधिकारी, तक्रारदार, यांचा स्थळ पाहणी पंचनाम्याचा कार्यक्रम ठेवला होता. घटनास्थळी तक्रारदार वनखात्याचे अधिकारी पोलीस व कंपनीचे अधिकारी पोहोचले. मात्र तहसील कार्यालयातील महसुल खात्याचा कुणीही कर्मचारी अथवा अधिकारी तसेच भूमिअभिलेख कार्यालयाचे कुणीही अधिकारी हजर नसल्याने हा पाहणी दौरा तात्काळ रद्द करावा लागला. आतापर्यंत चार वेळा हा पाहणी दौरा रद्द करावा लागला असल्याचे डुंबरे यांनी सांगितले.






# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदिनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.



**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## आजचे अन्नदाते



**स्व. श्री. बखतावरमालजी ओटरमालजी मेहता, स्मरणार्थ, श्री. ज्वेलर्स अलिबाग**

## संपादकीय

# लाट सपाट

दैनंदिन रुग्णसंख्या आणि चाचण्यांच्या तुलनेत कोरोना बाधितांच्या प्रमाणाचा आढावा घेतल्यानंतर देशातील कोरोना रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात घसरलेली असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांनी लागू केलेले कोरोनाचे अतिरिक्त निर्बंध मागे घ्यावेत, अशी सूचना केली आहे. ही अलिकडच्या काळातील अत्यंत दिलासादायक बातमी आहे. अखेर आणि अपेक्षेनुसार कोरोना रुग्णांची संख्या फेब्रुवारीच्या मध्यास खाली जाईल हा अंदाज खरा ठरला आणि तिसरी लाट त्या अर्थाने आली नाही आणि जी आली ती आता सपाट झाली आहे असा त्याचा अर्थ आहे. त्या दृष्टीने केंद्राने परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांसाठीचे निर्बंध नुकतेच शिथिल केले आहेत हेही लक्षात घ्यायला हवे. कोरोनाची तिसरी लाट अधिक भयावह असेल असे काही जण म्हणत होते आणि काही अभ्यासक तिसरी लाट येणारच नाही, कारण मोठ्या प्रमाणात लसीकरण झाले आहे, असे मत व्यक्त करीत होते. दुसऱ्या लाटेने जो काही हाहाकार माजवला ते पाहता अनेक जण तिसऱ्या लाटेच्या वृत्ताने धास्तावलेले होते. परंतु तिसरी लाट आली तरी त्याचा परिणाम सौम्य होता. हानी झाली तरी त्या प्रमाणात झाली नाही. राज्य सरकारने आधीप्रमाणेच अधिक काळजी घेत त्वरीत निर्बंध लागू केले आणि लाट आटोक्यात आणली. आता अखेर या केंद्र सरकारच्या सूचनेमुळे सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास सोडला असेल, यात शंका नाही. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी कोरोना निर्बंधांबाबत राज्यांच्या मुख्य सचिवांना बुधवारी पत्र पाठवले असून त्यात देशातील कोरोना रुग्णसंख्येचा आलेख २१ जानेवारीपासून घसरलेला दिसतो असे नमूद केले आहे. गेल्या आठवड्यात सरासरी दैनंदिन रुग्णसंख्या ५०,४७६ इतकी नोंदविण्यात आली असून गेल्या २४ तासांत २७,४०९ नवे रुग्ण आढळले. तर दिवसभरात करण्यात आलेल्या कोरोना चाचण्यांच्या तुलनेत बाधितांचे प्रमाण ३६३ आढळले असे म्हटले आहे. डिसेंबरमध्ये कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ दिसून आल्यानंतर अनेक राज्यांनी आपल्या सीमा आणि विमानतळांवर अतिरिक्त निर्बंध लागू केले होते. ही साथ पसरू नये यासाठी सार्वजनिक ठिकाणी आरोग्य विषयक निर्बंध लागू केले होते. आता या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य सचिवांनी राज्यांना एका बाजूला पूर्णपणे गाफिल राहू नये याकरिता संकटाला तोंड देण्यासाठी काही उपाययोजना आवश्यक असल्याचे नमूद करतानाच राज्यातील प्रवेशद्वारांवर विविध राज्यांनी लागू केलेल्या अतिरिक्त निर्बंधांमुळे प्रवास आणि आर्थिक व्यवहारांना अडथळा येणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी, असे स्पष्ट म्हटले आहे. याचा अर्थ सर्व राज्यांना आपआपल्या भागांतील परिस्थितीनुसार निर्णय घ्यावेत आणि एकंदर आर्थिक व्यवहारांवर परिणाम करणाऱ्या आंतरराज्यीय निर्बंधांना मागे घ्यावे अशी केंद्र सरकारची इच्छा आहे. म्हणजे विनाकारण आर्थिक व्यवहारांना आळा बसू नये. कारण कोरोनाच्या निर्बंधांमुळे गेल्या दोन वर्षांत झालेल्या नुकसानीचा अद्याप कोणाला अंदाज आलेला नाही. म्हणून आता परिस्थिती अनुकूल होत असताना कोरोना नियंत्रणाबरोबरच सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन आणि त्यांचे रोजगार यावरील परिणाम कमीतकमी होईल, यावर भर देण्याची गरज व्यक्त केली आहे. केंद्र सरकारच्या सूचनेपूर्वी मंगळवारी आसामने निर्बंध हटवले होते व ते तसे करणारे पहिले राज्य ठरले. त्यापाठोपाठ हरियाणाने कोरोना निर्बंध पूर्णत: मागे घेतल्याची घोषणा बुधवारी केली आहे. आपल्या राज्यातही कोरोनारुग्ण घटले असून बुधवारी २७४८ नवे रुग्ण आढळले व ४१ रुग्णांचा मृत्यू झाला. संपूर्ण निर्बंध उठवण्याबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे लवकरच घोषणा करतील अशी अपेक्षा आहे. तिसऱ्या लाटेदरम्यान, विविध राज्यांनी रात्रीचा कर्फ्यू, मेळाव्यातील संख्येवर निर्बंध, शैक्षणिक संस्था बंद करणे आणि रेस्टॉरंट्स आणि थिएटरमधील संख्येवर निम्म्याने मर्यादा आणण्यासारखे उपाय जारी केले होते. त्यापैकी काही निर्बंध उठलेले आहेत आणि बाकीचे आता उठतील, अशी अपेक्षा आहे. म्हणजे आता एक फार मोठे संकट संपुष्टात आले आणि जगासाठीचे एक भीषण दु:स्वप्न संपले असे म्हणायला हरकत नाही. आपले राज्य, देश आणि जग पूर्वीसारखे सर्वसामान्य कदाचित होणार नाही, कारण खूप मनुष्यहानी आणि आर्थिक हानी झालेली आहे. तरीही आपले जीवन अधिक सुखद होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही.

भालचंद्र जोशी

# जखम डोक्याला, मलम पायाला!

*राज्यातल्या अधिकाऱ्यांचं केंद्रात प्रतिनियुक्तीवर येण्याचं प्रमाण घटल्याने केंद्र सरकारने १९५४ च्या आयएएस केडर्स रुल्समध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला. आपल्या अधिकारांवर गदा येणार, अशी भावना होऊन विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांमध्ये या प्रस्तावाला विरोध होत आहे. या साऱ्यात आयएएस आणि आयपीएस सेवांचं महत्त्व संपुष्टात येण्याचा धोका वाढून संघराज्य रचनेला धोका निर्माण होऊ शकतो.*



राज्य आणि केंद्र सरकारमधल्या सलोख्याचा मुद्दा या ना त्या कारणाने सतत चर्चेत येत असतो. सामोपचाराने वागून जनसामान्यांच्या हिताचा विचार करणं दोन्ही बाजुंसाठी कळीचा मुद्दा असला तरी प्रत्यक्षात तसं घडत नाही. त्यामुळे बरेचदा राजकीय कुरघोडीचे प्रसंग समोर उभे ठाकतात. दोन्हीकडे वेगळ्या विचारांची सरकारं असतील आणि राजकीय विरोधक असतील तर या निमित्ताने संघर्ष जणू ठरलेलाच. फक्त दरवेळी नवी कारणं समोर येत असतात. आताही असंच काही घडत असून दोन्ही सरकारं समोरासमोर उभी ठाकली आहेत. यामागील कारणं लक्षात घेतली असता प्रश्न सहज सुटण्यासारखा असल्याचं दिसतं. पण काही प्रमाणात अहंकार आणि काही प्रमाणात असहकार यामुळे विषय ताणला गेला आहे. त्यातल्या त्यात पश्चिम बंगाल किंवा महाराष्ट्रासारख्या राज्यांशी केंद्र सरकारचा संघर्ष अधिक वाधला असल्याचं जाणवतं. लोकशाहीत संघराज्य पद्धतीत केंद्र आणि राज्य सरकारांनी हातात हात घालून काम करणं अपेक्षित असताना सतत संघर्षच होत असल्याचं दिसतं. आताही राज्यातून केंद्रात होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवरून केंद्र आणि राज्य सरकारं आमनेसामने आली आहेत. खरं तर केंद्रात प्रतिनियुक्तीवर जाणाऱ्या आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांच्या संख्येत घट होत असताना त्यावर मार्ग काढण्याऐवजी केंद्र सरकारने अशा प्रतिनियुक्तीसाठी राज्य सरकारच्या मंजुरीची अटच वगळण्याचा प्रस्ताव पुढे आणला आहे. हा प्रकार जखम डोक्याला आणि मलम पायाला या उक्तीप्रमाणेच म्हणावा लागेल.

सध्याच्या घडीला देशात भारतीय जनता पक्षाची सत्ता असलेलं केंद्र सरकार आणि राज्य सरकारं एका बाजुला आणि दुसऱ्या बाजूला भाजपेतर पक्षांची सत्ता असलेली राज्यं असे दोन भाग देशात पडले आहेत. केंद्रातल्या नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने कोणताही निर्णय घेतला तरी तो भाजपची सत्ता असलेली राज्यं उचलून धरतात तर भाजपेतर पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांमध्ये त्याचा विरोध होतो. जमीन हस्तांतरण आणि शेती सुधारणांचा मुद्दा, जीएसटी, इंधनाच्या किमती, एक देश-एक दर अशा एक ना अनेक मुद्द्यांवर आतापर्यंत केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये संघर्ष उडाल्याचं देशाने पाहिलं. विशेषतः पश्चिम बंगालमधलं ममता बॅनर्जी सरकार आणि महाराष्ट्रातलं महाविकास आघाडी सरकार केंद्राच्या विविध निर्णयांना विरोध करताना दिसलं आहे. मध्यंतरी मुख्य सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याच्या केंद्रातल्या प्रतिनियुक्तीवरून केंद्र आणि पश्चिम बंगाल सरकारमध्ये असाच मोठा संघर्ष झाला होता. केंद्राने आदेश देऊनही ममता बॅनर्जी यांनी आपल्याकडील अधिकाऱ्याला केंद्रात प्रतिनियुक्तीवर पाठवण्यास नकार दिला होता. अशी एक ना अनेक उदाहरणं पहायला मिळाली आहेत.

तोच धागा पकडून आता मोदी सरकारने राज्यांची कोंडी करताना भारतीय प्रशासकीय सेवेतल्या (आयएएस) आणि पोलीस सेवेतल्या (आयपीएस) अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर केंद्राच्या सेवेत घेण्यासाठी राज्य सरकारच्या मान्यतेची अट वगळण्याचा प्रस्ताव पुढे आणला आहे. केंद्र सरकारच्या या प्रस्तावामुळे केंद्र आणि राज्यांमध्ये नवी ठिणगी पडली आहे. या मुद्द्यावर केंद्राच्या 'आ रे'ला राज्यांकडून 'का रे'चं उत्तर मिळणं अटळ आहे. विरोधी पक्षांची सरकारं असणाऱ्या राज्यांनी तर या नव्या प्रस्तावाला उघडपणे कडाडून विरोध केलेलाच आहे. मात्र भाजपची सरकारं असणाऱ्या राज्यांनाही केंद्राची ही अरेरावी मनातून रुचणं कठीणच जाणार आहे. अर्थात, केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये असा संघर्ष पूर्वापार चालत आला आहे. पण आता केंद्राच्या या प्रस्तावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाल्यास देशाच्या प्रशासकीय व्यवस्थेत पक्षीय राजकारण शिरुन देशाला गंभीर परिणाम भोगावे लागू शकतील, अशी चर्चा सुरु झाली आहे.

मुळात स्वतंत्र व समर्थ संघराज्यासाठी केंद्रीय स्तरावर सक्षम, स्वतंत्र आणि समर्थ प्रशासकीय यंत्रणा आवश्यक असल्याची गरज देशात सर्वप्रथम सरदार वल्लभभाई पटेल यांनी ओळखली होती. त्यातूनच त्यांनी आयएएस व आयपीएस या यंत्रणांचा पाया घातला होता. नोकरशाहीची देशातली आजची तगडी इमारत याच पायावर बांधली गेली आहे. या यंत्रणांच्या नियमावलीनुसार या सेवेतल्या अधिकाऱ्यांची निवड केंद्र पातळीवर केली जाते. ही निवड झाल्यावर केडरनुसार या अधिकाऱ्यांना राज्य सरकारच्या सेवेत किंवा इतरत्र नेमलं जातं. ठराविक कालावधीनंतर राज्यांनी परस्पर सामंजस्य आणि संबंधित अधिकाऱ्याची इच्छा आणि मत लक्षात घेऊन यातल्या अधिकाऱ्यांना ठराविक संख्येने केंद्राच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर पाठवावं, असं हा पाय रचताना अपेक्षिलं गेलं होतं.

राज्य सरकारांच्या सेवेत असलेले अधिकारी ठराविक कालावधीनंतर केंद्र सरकारच्या सेवेत उपलब्ध व्हावेत, त्यातून केंद्राला पुरेसे अधिकारी प्राप्त व्हावेत, ही त्यामागची अपेक्षा होती.

सुरुवातीच्या काळात असं होतही गेलं. पण नंतर यात राजकीय हस्तक्षेप वाढले. केंद्र आणि राज्य सरकारमध्येही काही अधिकाऱ्यांच्या नियुक्तीवरून मतभेद झाले. काही वेळा राज्य सरकारं केंद्राची अपेक्षा पूर्ण करण्यास टाळाटाळ करू लागले. अनेकदा अधिकाऱ्यांना केंद्रात प्रतिनियुक्तीस पाठवण्यास नकार देऊ लागले. यातून केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये संघर्ष उडू लागला. गेल्या सात वर्षांमध्ये तर हा संघर्ष टोकाला पोहोचला आहे. २०१४ पासून २०२१ पर्यंतच्या सात वर्षांची आकडेवारी पाहिल्यास केंद्रात प्रतिनियुक्तीवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संख्येत निम्म्याहून अधिक घट झाल्याचं दिसतं. सध्या हे प्रमाण ६९ वरून ३० टक्क्यांपर्यंत खाली आलं आहे. अर्थात, या संघर्षाला केंद्र आणि राज्य सरकारं असे दोन्ही घटक कारणीभूत मानावे लागतील.

अनेकदा राज्य सरकारांना किंवा तिथल्या सत्ताधारी पक्षाला पूरक कामं करणाऱ्या अधिकाऱ्यांना आपल्या हट्टापोटी किंवा अनेकदा राज्य सरकारला अडचणीत आणण्यासाठीही केंद्राने आपल्याकडे बोलावून घेतल्याचे प्रकार घडले आहेत. तर राज्य सरकारांनीही केवळ पक्षीय धोरणातून केंद्राच्या अशा निर्णयांना विरोध करत अधिकाऱ्यांना आपल्याकडेच रोखून धरल्याचे प्रकार घडल्याचं सांगण्यात येतं.

असा संघर्ष देशाला निश्चितच परवडण्यासाखा नाही. राज्यातल्या अधिकाऱ्यांचं केंद्रात प्रतिनियुक्तीवर येण्याचं प्रमाण का घटलं, याचा विचार केंद्र सरकारने करून त्यावर उपाययोजना करणं अपेक्षित आहे. या समस्या दूर करण्याची गरज आहे. केंद्रामध्ये काम करण्यासाठी मोकळं वातावरण असल्याचा विश्वास त्या अधिकाऱ्यांना दाखवून द्यायला हवा. तरच या मुद्द्यावर तोडगा निघू शकतो. सोबतच केंद्र सरकारने सामंजस्य दाखवून मोठ्या भावाची भूमिका घेऊन या मुद्द्यावर राज्य सरकारांशी संवाद साधायला हवा होता. राज्य सरकारांनीही अडेलतट्टू भूमिका सोडून या संवादात सहभागी होणं गरजेचं आहे. पण असं घडण्याऐवजी एकूण वादविषयाकडे केवळ राजकीय हेतूने बघितलं जात आहे. त्यातूनच केंद्र आणि राज्यांमध्ये संघर्ष अटळ होत चालला आहे. शिवाय एखाद्या राज्याने ठराविक कालावधीनंतर त्यांच्याकडील अधिकारी केंद्रात प्रतिनियुक्तीवर न पाठवल्यास कारवाई करण्याचा अधिकारही केंद्राला वापरता आला असता, पण तसं करण्याऐवजी केंद्र सरकारने थेट १९५४ च्या आयएएस केडर्स रुल्समध्ये सुधारणा करण्याचाच निर्णय घेतला. यातून आपली कुचंबणा होणार, आपल्या अधिकारांवर गदा येणार अशी राज्य सरकारांची भावना झाली आहे.

त्यामुळेच आता विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांमध्ये या नव्या प्रस्तावाला उघडपणे कडाडून विरोध होत आहे. मात्र भाजपची स्वपक्षाची सरकारं असलेल्या राज्यांनाही केंद्राची ही अरेरावी मनातून रुचणं कठीण जाणार आहे. पण या साऱ्यात आयएएस आणि आयपीएस या सेवांचं महत्त्वच संपुष्टात येण्याचा धोका संभवत असून, या प्रस्तावाच्या माध्यमातून केंद्र आणि राज्यांमध्ये निर्माण झालेला संघर्ष वाढत गेल्यास संघराज्य रचनेला धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे मात्र निश्चित.

वारा-वारा
नेहा कवळे

# वधू पक्ष घेणार हुंडा

पूर्वी नवरी मुलीकडून नवऱ्या मुलास हुंडा देण्याची पद्धत रूढ होती; परंतु आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांचे वय होऊनसुद्धा मुलगी मिळत नाही. त्याचबरोबर शहरी भागातही तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे मुलांकडून मुलींच्या कुटुंबियांना हुंडा देण्याची वेळ आली आहे. शिवाय स्वजातीला मुली मिळत नसल्याने आंतरजातीय मुलींचा शोध घेण्याची वेळ पालकांवर आली आहे. आजच्या काळात मुली या मुलांपेक्षा जास्त शिक्षण घेत आहेत. त्यामुळे साहजिकच त्यांच्या अपेक्षा वाढत आहेत. आता मुलगी लग्नाला तयार झाली की तिच्या अनेक अटी असतात. त्यात जास्त शिकलेली मुलगी ही शेतकरी नवरा नको असे सर्वत्र ऐकायला मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना मुली मिळणे कठीण झाले आहे. सुरुवातीच्या काळात मुलांकडील मंडळी मुलीला लग्नासाठी पहायला गेले की, अनेक अटी त्या मुलीसमोर ठेवत असत. कधी तर हुंडा कमी पडला म्हणून अनेक लग्न मोडलेली ऐकावयास यायचे. पण आताचा काळ वेगळा आहे. आता मुलगी ही मुलाच्या बरोबरीने किंवा त्यांच्यापेक्षा अधिक शिक्षण घेत असल्याने मुलींच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यात तर व्यवसाय, शेती करणाऱ्या मुलांची तर वय उलटूनही त्यांना मुलगी मिळत नाही. तर मोठ्या कंपनीत कामाला असणाऱ्या पुणे, मुंबई येथे राहणाऱ्या मुलांची लग्ने लगेचच जमतात. परंतु कमी पगारावर असणाऱ्या किंवा शेतकरी मुलाचे लग्न ठरविण्यासाठी त्याच्या पालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. कधी कधी तर नवरी मुलीच्या कुटुंबियांना हुंडा देऊन त्या मुलाचे लग्न ठरविण्यात येते. सध्या मुलांच्या पालकांना मुलांच्या लग्नाची चिंता सतावत आहे. लग्न ठरविणाऱ्या संस्था, मंडळी यांची मदत घेऊनही लग्न ठरत नसल्याने अनेक तरूण मंडळी नैराश्याखाली येत आहेत. आताच्या काळात जर स्वजातीय मुलीशी लग्न करायचे असेल तर वरपक्षाला खूप खर्च करावा लागतो. तसेच वधू पक्षाकडील मंडळींचा सर्व खर्चही त्यांना करावा लागतो.

# हेडफोन वापरणाऱ्यांनो सावधान

कोणत्याही वस्तूच्या अतिवापराचा फटका बसतोच. मोबाईलच्या अतिवापराने विविध आजार जडतात हे आपल्याला माहीत आहे. मात्र, हेडफोनचाही वापर तितकाच धोकादायक ठरू शकतो. आजुबाजूला लक्ष दिलेत तर अनेक जण रेल्वेतून प्रवास करताना किंवा चालताना हेडफोन लावून गाणी ऐकताना किंवा मोबाईलवर चित्रपट आणि वेबसिरीज पाहताना दिसतील. मात्र अशी तुम्हालाही सवय असेल तर लगेचच ही सवय सोडा... कारण सतत इअरफोन वापरणे धोकादायक ठरू शकते. काही जण सर्वसामान्यांप्रमाणे न बोलता जोराने किंवा ओरडून बोलतात. कधी कधी दहा वेळा हाक मारल्यावरसुद्धा संबंधित व्यक्ती प्रतिसाद देत नाहीत, असे प्रकार सर्रास घडताना दिसतात. मात्र हा एक आजार असल्याचे आता समोर आले आहे. हेडफोनच्या अतिवापरामुळे कमी ऐकू येणे किंवा कानाचे इन्फेक्शन असे आजार जडतायत. शिवाय चिडचिड, डोके दुखणे कानाचे संक्रमण, कानात वेदना, मेंदूला दुखापत, चक्कर येणे, मानसिक ताण अशी दुखणी डोके वर काढतात. सातत्याने आवाजाचा आघात आरोग्यास हानिकारक होतो. त्यामुळे हेडफोनचा अतिवापर टाळणे हे अत्यंत गरजेचे आहे. या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर पालकांनी आपल्या मुलांना हेडफोन वापरापासून परावृत्त करणे गरजेचे आहे. तसेच मोठ्यांनीही कानाच्या विकाराचा धोका समजून घेत हेडफोनचा वापर करणे आवश्यक आहे. मुलांचे अवयव हे नाजूक असतात. ते विकसित होत असताना कानावर सातत्याने आवाजाचा आघात झाल्यास कानाला इजा होऊ शकते. तसेच मोठ्या व्यक्तीच्या ही बाबतीतही असेच घडू शकते. कान आपल्या शरीराचा महत्वाचा भाग आहे. कानावर १०० डेसिबल पेक्षा अधिक आवाजाचा सातत्याने आघात होत असेल तर बहिरेपणा येण्याची शक्यता अधिक असते तसेच मेंदूला सूज ही येते. सध्या तरूणांमध्ये हेडफोनवर गाणी ऐकण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परंतु त्याचा सातत्याने वापर होत असेल त्याचा मोठा दुष्परिणाम होऊ शकतो.




वासांसि जीर्णानि यथा विहाय ।
नवानि गृह्यति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा ।
न्यन्यानि संयाति नवानि देही ।।२२।।

वासांसि- वस्त्रे; जीर्णानि- जुनी आणि झिजून गेलेली; यथा- ज्याप्रमाणे; विहाय- टाकून; नवानि- नवी वस्त्रे; गृह्यति- ग्रहण करतो; नरः- मनुष्य; अपराणि- दुसरी; तथा-त्याप्रमाणे; शरीराणि- शरीरे; विहाय- टाकून; जीर्णानि- जुनी आणि निरुपयोगी झालेली; अन्यानि- निराळी; संयाति- खचित धारण करतो; नवानि- नवी; देही- देहधारी जीवात्मा.

ज्याप्रमाणे मनुष्य जुन्या वस्त्रांचा त्याग करुन नवीन वस्त्रे धारण करतो त्याप्रमाणे आत्माही जुन्या आणि निरुपयोगी शरीराचा त्याग करुन नवीन भौतिक शरीर धारण करतो.

तात्पर्य : अणुरुप आत्म्यांकडून होणारे शरीराचे स्थानांतर हे एक स्वीकृत तथ्य आहे. आधुनिक वैज्ञानिकांचा आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास नाही तसेच त्यांना हृदयातून उगम होणाऱ्या शक्तीचे स्पष्टीकरणही देता येत नाही, पण अशा वैज्ञानिकांनासुद्धा शरीरात होणारे बदल, जे बाल्यावस्थेतून कौमार्यावस्था आणि कौमार्यवस्थेतून तारुण्यवस्था आणि पुन्हा तारुण्यावस्थेतून वार्धक्यावस्था अशा विविध अवस्थांमधून दिसून येतात ते मान्य करावेच लागतात. वृद्धावस्थेतून जो बदल होतो तो दुसऱ्या शरीरात संक्रमित करतो. याचे स्पष्टीकरण पूर्वीच एका श्लोकामध्ये करण्यात आले आहे.

अणुरुप जीवात्म्याचे दुसऱ्या शरीरात होणारे संक्रमण हे परमात्म्याच्या कृपेमुळे शक्य होते. ज्याप्रमाणे एखादा मित्र दुसऱ्या मित्राची इच्छापूर्ती करतो त्याचप्रमाणे परमात्माही अणुरुप आत्म्याचीइच्छापूर्ती करतो. मुण्डकोपनिषद तसेच श्वेताश्वतरोपनिषद यांसारख्या वैदिक साहित्यात आत्मा आणि परमात्मा यांची तुलना ही एकाच वृक्षावर बसलेल्या दोन मित्र पक्ष्यांबरोबर करण्यात आली आहे. त्यापैकी एक पक्षी (अणुरुप जीवात्मा) वृक्षाची फळे खात आहे आणि दुसरा पक्षी (श्रीकृष्ण) आपल्या मित्राकडे केवळ पाहत आहे. गुणात्मकदृष्ट्या एकच असणाऱ्या या दोन पक्ष्यांपैकी एक पक्षी भौतिक वृक्षाच्या फळांनी मोहित होतो तर दुसरा पक्षी आपल्या मित्राच्या हालचालींचा केवळ साक्षी आहे. श्रीकृष्ण हे पाहणारे साक्षी पक्षी आहेत आणि अर्जुन फळे चाखणारा पक्षी आहे. जरी ते मित्र असले तरी त्यामधील एकजण स्वामी आहे आणि दुसरा सेवक आहे. आत्म्याचे या संबंधाबद्दल किंवा नात्याबद्दल होणारे विस्मरण हे त्याच्या एका वृक्षावरुन दुसऱ्या वृक्षावर किंवा एका शरीरामधून दुसऱ्या शरीरामध्ये होणाऱ्या स्थानांतरास कारणीभूत ठरते. जीवात्मा भौतिक शरीररुपी वृक्षावर अत्यंत संघर्ष करीत असतो. ज्याप्रमाणे अर्जुन स्वेच्छेने उपदेशाकरीता श्रीकृष्णांना शरण गेला त्याप्रमाणे ज्याक्षणी एक पक्षी दुसऱ्या पक्षाचा परमश्रेष्ठ आध्यात्मिक गुरु म्हणून स्वीकार करतो तत्क्षणी तो कनिष्ठ किंवा गौण पक्षी सर्व प्रकारच्या शोकातून मुक्त होतो. मुण्डकोपनिषद आणि श्वेताश्वतरोपनिषद दोन्हीही या विधानाला पुष्टी देतात.

समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ।।


'जरी दोन पक्षी एकाच वृक्षावर असले तरी झाडाची फळे चाखणारा पक्षी चिंता आणि खिन्नता यांनी पूर्णपणे ग्रस्त झालेला असतो. परंतु कोणत्याही रीतीने त्याच्या मित्राकडे, म्हणजेच भगवंताकडे तो ज्याक्षणी पाहतो आणि त्यांची महानता जाणतो तत्क्षणी तो दुःखग्रस्त झालेला पक्षी सर्व चिंतातून मुक्त होतो.' अर्जुनाने आता त्याच्या नित्य मित्राकडे म्हणजेच श्रीकृष्णांकडे पाहिले आहे आणि त्यांच्याकडून तो भगवद्गीता जाणून घेत आहे. याप्रमाणे श्रीकृष्णांकडून श्रवण केल्यामुळे तो भगवंतांची परम लीला जाणून शोकातून मुक्त होऊ शकतो. **(क्रमशः)**

**(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)**

## लोकसंसद

### अलविदा बप्पीदा...

आपल्या भारदस्त व वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने ८० च्या दशकात तरूणाईला डिस्को करण्यास लावणारे आलोकेश लाहिरी म्हणजेच बप्पी लहिरी यांच्या निधनाने डिस्कोची धून शांत झाली.



प्रयोगशील संगीतकार आणि गायक म्हणून अल्पावधीत आपल्या जादुई आवाजाने तरुणांना डिस्कोच्या गाण्यावर ठेका धरायला लावला. बॉलिवूडमध्ये डिस्को आणि रॉक संगीत आणणारे पहिले संगीतकार व गायक आहेत. चलते-चलते, नमक हलाल, डिस्को डान्सर, शराबी इत्यादी अनेक सुपरहिट चित्रपटाचे संगीत त्यांनी दिले. 'प्यार मांगा है तुम्हीं से', 'माना हो तुम बेहद हसी' सारखी इतर अनेक गाणी त्यांनी अजरामर केली. आजही बप्पीदांचे गाणे आठवतात 'चलते-चलते मेरे ये गीत याद रखना कभी अलविदा ना कहना'

**- दत्तप्रसाद शिरोडकर**, मुलुंड

### राजकीय आरोपांविषयी लोकांचा सूर जाणा !

'सर्वच राजकारण्यांची घर काचेची असतात याचे भान राहू द्या', असे मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी म्हटले आहे. राज्यात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जो कलगीतुरा चालू आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे विधान आहे. नेत्यांचे एकमेकांवरील आरोप प्रत्यारोप काही असू दे भारतीय न्यायालयीन कायद्यानुसार दोषींना शिक्षा तेव्हाच होते जेव्हा आरोप न्यायालयात पुराव्यानिशी सिद्ध होतात आणि त्यावर न्यायालय निर्णय देते. ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे, हे कोणास ठाऊक नाही अशी व्यक्ती नाही. केंद्रीय अन्वेषण यंत्रणांनी एकच करावे की, सर्वच राजकिय पक्षांवर धाडी टाकण्यासाठी आरंभ करावा. त्यामुळे काचेची घरे असणाऱ्या मंडळींची संख्या किती आहे? हे जशा धाडी पडतील तसे समोर येत राहील. पण असे का होत नाही. याविषयी भाजप काही बोलत नाही. विरोधी पक्षांतील बरेच नेते भाजपवासी झाले आहेत. लक्षवेधी म्हणजे आधी काँग्रेसमध्ये मंत्री असलेले आणि आता भाजपचे झालेले हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले होते की, 'भाजपमध्ये मी मस्त निवांत आहे, शांत झोप लागते आपल्यामागे चौकशी नाही काही नाही.' म्हणजे भाजपवासी व्हा किंवा त्यांचे म्हणणे ऐका अन्यथा केंद्रीय यंत्रणांना तोंड द्या. हा भ्याडपणा होय. हा ब्लॅकमेल करण्याचा प्रकार म्हणजे उघड भ्रष्टाचार नाही का? म्हणजे जे यांचे ऐकतात, ऐकतील त्यांनी आधी काहीही केलेले असो अथवा आताही काहीही करत असो त्यास अधिकृत मान्यता असण्याजोगेच आहे, असा लोकांत सूर आहे. प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते वगळता सामान्य जनतेला राजकारण आणि राजकारणी यांच्याशी देणेघेणे नाही. 'राजकारणात कोणी कोणाचा शत्रू नसतो' या वाक्याची प्रचिती जनतेला महाराष्ट्रात सत्ता स्थापनेच्या वेळी आली आहे. त्यामुळे विद्यमान सत्ताधारी काय आणि त्यांचे विरोधक काय हे सोयीस्कर राजकारण करतात यावरच जनतेचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे यांच्या एकमेकांवरील चिखलफेकीला जनता काडीचेही महत्त्व देत नाही. विरोधी पक्षाने यांच्यावर कोणत्यातरी प्रकरणाला धरून आरोप केले की मग आरोप झालेले आरोप केलेल्यांचे पाय कसे मातीचे आहेत, हे छाती बडवून सांगणार. राजकारण्यांनी ही नाटक बंद करावीत. नेते जसे एकमेकांवर आरोप करून आमच्याकडेही तुमच्या घोटाळ्यांची माहिती आहे, हे ओरडून सांगतात. त्याचप्रमाणे जनतेलाही राजकारण्यांकडे असलेल्या संपत्तीविषयी जाणून घेण्याची तीव्र उत्सुकता आहे. यासाठी निवडणूक आयोगाने खालील सूत्र लागू करावी १. स्वतःकडील संपत्तीचे विवरण उमेदवारी अर्जात नमूद करण्यासह त्या संपत्तीत वाढ कशी झाली? त्यासाठी काय केले? याविषयी मतदारसंघात पत्रकार परिषद घेऊन लोकांना सविस्तर सांगणे बंधनकारक करावे, तसेच यामध्ये लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची योग्य पुराव्यासह समाधानकारक उत्तरे देता न आल्यास उमेदवारी अर्ज बाद करावा. उमेदवाराने घोषित केलेल्या संपत्तीविषयी आक्षेप असेल म्हणजे ती अधिक आहे आणि कमी दाखवली आहे असे कोणाकडे पुरावे असतील तर ते सादर करण्यासाठी काही कालावधी द्यावा आणि त्यात तथ्य असल्यास अर्ज बाद करून निवडणूक लढवण्यावर कायमस्वरूपी बंदी टाकण्यासह त्याला सश्रम कारावास द्यावा. अशा सूत्रांसाठी केंद्रीय, राज्यस्तरीय अन्वेषण यंत्रणांचे साहाय्य कसे घ्यायचे याचे नियोजन असावे. २. निवडणूक लढवण्यासाठी अत्यल्प संपत्ती असलेलाच म्हणजे काही लाखांत संपत्ती असलेला, किमान पदवीधर उमेदवारच पात्र मानण्यात यावा. ३. खासदार, आमदार, मंत्री आदी असताना शासकीय कामांची कंत्राटे मिळवण्यासाठी कोणत्या कंपन्या चालू केल्या आणि त्यांना किती रुपयांची किती कंत्राटे मिळाली याची माहिती मतदारसंघात सार्वजनिक ठिकाणी लावणे अत्यावश्यक करावे. राजकारण्यांच्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक, मित्र वगैरे यांच्याही संपत्तीचे अन्वेषण होत असल्यास वावगे नाही. त्यामुळे घरापर्यंत पोचले वगैरे सांगून गळा काढण्याला अर्थच नाही. न जाणो कोणाकडे कोणते घबाड मिळेल. सत्य शोधण्यासाठी पाळेमुळे खणणे अनिवार्य असते. नेत्यांची संपत्ती ५ वर्षांत काही पटीने वाढते. ती कशी? यामागील कारणे लोकांसमोर आलीच पाहिजेत.

**- जयेश राणे, भांडुप**

# हॉटेल्स-रेस्टॉरंट्स मध्यरात्रीपर्यंत राहणार सुरु

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

रत्नागिरी जिल्ह्यात कोरोना रूग्णसंख्या घटत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा हॉटेल असोसिएशनच्या विनंतीचा विचार करून जिल्हाधिकारी डॉ. बी. एन. पाटील यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व रेस्टॉरंट व उपहारगृहे ही दररोज रात्री १२ वाजेपर्यंत ५० च्या क्षमतेनेच सुरू ठेवण्याची सशर्त परवानगी देण्यात आली आहे. कोरोना निर्बंधाच्या काळात रत्नागिरी जिल्हयातील

### जिल्हाधिकाऱ्यांनी निर्बंधात दिली सवलत

### जिल्ह्यातील हॉटेल व्यवसायिकांना दिलासा

रेस्टॉरंटस व उपहारगृहे दररोज रात्री १० ते सकाळी ८ पर्यंत बंद राहतील असे आदेश देण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्हा हॉटेल असोसिएशन यांनी जिल्हाधिकारी डॉ बी. एन. पाटील यांची भेट घेतली होती व आपले म्हणणे मांडले होते. त्यामध्ये नव्याने सुरू होणारी पर्यटन स्थळे, शाळा, व्यापार यांचा विचार करता हॉटेलसाठी रात्री १० पर्यंतची वेळ ही गैरसोयीची ठरत होती.

सर्वसाधारणपणे हॉटेलमध्ये येणारे ग्राहक हे रात्री नऊ वाजल्यानंतर हॉटेलमध्ये यायला



सुरूवात होते. मात्र, १० नंतर सुरू होणाऱ्या पोलीस बंदोबस्ताला घाबरून सध्या हॉटेलमध्ये येणे ग्राहक टाळत होते. यामुळे आमच्या व्यवसायावर याचा विपरीत परिणाम होत आहे. हॉटेल व्यावसायिकांना त्याचा आर्थिक फटका बसत आहे. तसेच ग्राहकांची देखील गैरसोय होत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील हॉटेल्स रात्री बंद करण्याची वेळ ही रात्री ११ नंतरची केली जावी अशी विनंती केली होती.

अलिकडे कमी होत असलेली कोरोना रुग्णसंख्या लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी या निर्बंधात शिथिलता दिली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व रेस्टॉरंट व उपहारगृहे ही दररोज रात्री १२ वाजेपर्यत ५० क्षमतेनेच सुरू ठेवण्याची सशर्त परवानगी त्यांनी दिली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व रेस्टॉरंट्स आणि उपहारगृहाच्या ठिकाणी अभ्यागतांच्या माहितीसाठी अशा आस्थापनांच्या बाहेर दर्शनी ठिकाणावर एकूण क्षमता आणि सध्याची अभ्यागतांची संख्या दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील, दररोज घरपोच सेवेस परवानगी राहील असेही आदेशात म्हटले आहे.

## महत्त्वाचे

### दोन कासवांना 'सॅटेलाइट ट्रान्समीटर'

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे आणखी दोन ऑलिव्ह रिडले सागरी कासवांना सॅटेलाइट ट्रान्समीटर बसवून समुद्रकिनारी सोडण्यात आले. रेवा आणि लक्ष्मी अशी या कासवांची नावे आहेत. मंगळवारी 'वनश्री' नावाचे कासव गुहागर समुद्रकिनारी सोडण्यात आले. यापूर्वी 'प्रथमा' आणि 'सावनी या कासवांना वेळास आणि रत्नागिरी येथून सॅटेलाइट ट्रान्समीटर बसविण्यात आले होते. वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या सहकार्याने सागरी कासव निरीक्षण प्रकल्पांतर्गत भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर एकूण पाच कासवांना अशा प्रकारे सॅटेलाइट ट्रान्समीटर बसवण्यात आले आहेत. अशी माहिती अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक विरेंद्र तिवारी यांनी दिली.

### चिपळूणात उर्वी भाजी मॉल सुरू

। चिपळूण । वार्ताहर ।

लंडनमध्ये मॅनेजमेंटचे शिक्षण घेतलेल्या चिपळूणातील ओंकार सुचय रेडीज या तरुणाने चिपळूणमध्ये उर्वी भाजी मॉल सुरू करून नवतरुणांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून चिपळूणची बाजारपेठ आपले रुपडे बदलत आहे. चिपळूणमधील तरुण व्यावसायिक ओंकार रेडीज यांनी 'भाजीचा मॉल' अशी एक नवी संकल्पना शहरात आणली आहे. स्वच्छ, ताजी व आपल्याला हवी तेवढी आपल्या हाताने भाजी घेण्याची मुभा असल्याने अवघ्या काही दिवसातच भाजीच्या या छोट्या मॉलला ग्राहकांकडून चांगला प्रतिसादही मिळत आहेत. रेडीज यांनी 'उर्वी' नावाने हा चिपळुणातील पहिले भाजीचा मॉल सुरु केला आहे.

## रामपूर जि.प. गटातील कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी

। चिपळूण । वार्ताहर ।

चिपळूण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत यादव यांनी रामपूर जिल्हा परिषद गटातील जुन्या-नव्या कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी पक्षवाढीसह गावातील समस्या, विकासकामे याबाबतही चर्चा झाली. पक्षाच्या माध्यमातून काही प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. यादव यांनी रामपूर



जिल्हा परिषद गटातील रामपूर, आंबेरे, कौंढर आणि वाघिवरे येथील कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेतल्या. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नंदू थरवळ यांनी या दौऱ्याचे नियोजन केले होते. यावेळी प्रभाकर थरवळ, जनार्दन इंदूलकर, वाघिवरेचे सरपंच गोपाळ कदम, सुनील कदम, सखाराम कदम, डॉ. जगदीश पाटेकर, अजित मोहिते, सूर्यकांत टोले, सुरेश महाडिक, संदेश कदम, दत्ताराम जाधव, शांताराम भेकरे, काशिनाथ इंदुलकर, वासुदेव मेस्त्री, गुलजार कुरवले, रुपेश आवले आदी उपस्थित होते.

## लघु पाटबंधारे योजनेची बैठक

। चिपळूण । वार्ताहर ।

रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्ह्यातील लघु पाटबंधारे योजनेची कामे पुर्णत्वास नेण्याबाबतची आढावा बैठक शंकर गडाख राज्यमंत्री, मृद व जलसंधारण यांच्या उपस्थितीत खा. विनायक राऊत यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरी-सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आमदारांच्या समवेत मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. जलजीवन मिशन अंतर्गत लघु पाटबंधारे योजनेची कामे पुर्णत्वास नेण्याबाबत चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील योजनांचा आढावा घेण्यात आला. लघु पाटबंधारे योजना तिवरे योजनेच्या मंजूरीबाबत येत्या दोन महिन्यात कार्यवाही करून त्याचे नियोजन करण्यात यावे, सन-२०२१ मध्ये मंजूरी मिळालेल्या तळसर, मुंडे तर्फे सावर्डे, वांझोळे या योजनांचे स्थगिती आदेश उठवणे व कामे लवकरात लवकर चालू करणेबाबत मंत्री महोदय यांचेसोबत सकारात्मक चर्चा झाली. या बैठकीला आ. दिपक केसरकर, आ. शेखर निकम, आ. वैभव नाईक, आ. राजन साळवी, आ. योगेश कदम, थोरात, कुशिरे, प्रधाळे, काळे, दामा, भराडे, शिरोडकर, नार्वेकर आदि अधिकारी उपस्थित होते.

## वाशिष्ठी डेअरीच्या ईटीपी प्लांटचे आज भूमीपूजन

। संतोष पिळके । चिपळूण ।

कोकणातील शेतकऱ्यांसाठी पूरक व्यवसायाचा पर्याय उभा करून त्यांना समृद्ध करण्याचे स्वप्न उराशी बाळगून मे.वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि. या दुग्धप्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. ७ सप्टेंबर २०२१ रोजी तालुक्यातील पिंपळी खुर्द येथे चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था लि. चिपळूणचे संस्थापक व अध्यक्ष सुभाष चव्हाण यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमीपूजन झाले. या प्रकल्पाच्या ईटीपी प्लांटचे भूमीपूजन शुक्रवार, १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते आणि सुभाष चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. शेतीला पूरक व्यवसायाची जोड देऊन शेतकऱ्यांना दूध चळवळीत सक्रिय करण्याचे ठरवले आणि त्यातूनच मे. वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि. या प्रकल्पाची संकल्पना आकार घेऊ लागली.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

अत्याधुनिक व स्वयंचलित दूध संकलनासाठी १० गावे मिळून एक कलेक्शन सेंटर, महत्त्वाच्या ठिकाणी विभागवार दूध वितरण केंद्रे उभारणार, प्रकल्पात सहभागी शेतकऱ्यांना दर आठवड्याला दुधाचे पैसे अदा केले जातील, शेतकऱ्यांना गाई -म्हशींचा पुरवठा, खाद्याचा पुरवठा आणि पशुवैद्यकीय सुविधांचा पुरवठा शेतकऱ्यांसह हजारो तरुणांना रोजगाराची संधी, प्रकल्पाच्या शेतकऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी स्वतःचे पशुवैद्यकीय अधिकारी, प्रकल्पाच्या माध्यमातून अत्यल्प दरात शेतकऱ्यांना पशुखाद्य व चाऱ्याचा पुरवठा, प्रकल्पाबरोबरच दूधसंकलन क्षेत्रात दुधाचा दर्जा तपासण्यासाठी अद्ययावत लॅबोरेटरीज मोबाईल व्हॅन.

### वाशिष्ठी डेअरीचे प्रॉडक्टस्

*दुधासह दही , ताक , लस्सी , श्रीखंड , आम्रखंड , पनीर , तूप , सुगंधी दूध या दुग्धजन्य पदार्थांचेही उत्पादन वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स या प्रकल्पाच्या माध्यमातून केले जाणार आहे . अतिशय दर्जेदार आणि कोणतीही तडजोड न करता तयार होणारे हे दुग्धजन्य पदार्थ ग्राहकांचा विश्वास नक्कीच सार्थ ठरवतील .*

## विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप

। चिपळूण । वार्ताहर ।

रत्नागिरी जिल्हा चिपळूण तालुका कळवंडे गावातील सर्व विद्यार्थ्यांना प्रतिवर्षीप्रमाणे यावेळी मोफत वह्या वाटप सुनिल सावर्डेकर समन्वयक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती कमिटी यांच्या सौजन्याने चिपळूण तालुक्यातील पंचक्रोशीतील मालदोली, वैजी, भोम, पोसरे, कापसे, पाचाड, कालुस्ते, कोल्हेखजान, खेर्डी, व ईतर गावातील विद्यार्थीसाठी ५ हजार वह्या वाटप कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

कळवंडे गावातील विद्यार्थ्यांना सावर्डेकर यांच्या हस्ते वह्या वाटप व मधु सावर्डेकर, राम कडवेकर,




केतन पेवेकर, प्रकाश सावर्डेकर, राजेंद्र जाधव, विश्राम पवार, संभाजी चिपळूणकर, श्वेता जाधव, अश्विनी जाधव या गावातील मान्यवराच्या उपस्थितीत तिसरी ते दहावी विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येनी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बबन जाधव यांनी केले.

## मिरा पॅलेस गेस्ट हाऊस सुरु

। चिपळूण । वार्ताहर ।

चिपळूणमधील खेर्डी एमआयडीसी येथे मिरा पॅलेस गेस्ट हाऊसचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच ग्राहकांच्या सेवेत दाखल होत असल्याची माहिती रोहित देसाई यांनी दिली आहे. पार्टी मर्यादित निमंत्रितांच्या उपस्थितीत लग्नसोहळा, वाढदिवस, मुंज,गेट-टुगेदर, नामकरण, साखरपुडा, कॉन्फरन्स असे नानाविध देखणे कार्यक्रम साजरे करण्यासाठी आगळा वेगळा पर्याय यानिमित्ताने ग्राहकांना उपलब्ध झाला आहे.

## ८५ गावांच्या पाणी योजना मार्गी

। चिपळूण । वृत्तसंस्था ।

चिपळूण -संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेली कामे अतिशय संथ गतीने चालू आहेत. योजनेत येणाऱ्या अडचणी दूर करून त्या मार्गी लावण्याची मागणी आ. शेखर निकम यांनी केली होती. त्यानुसार राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी रखडलेल्या नळपाणी योजनेची अंदाजपत्रके तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. संगमेश्वर तालुक्यातील तांत्रिकदृष्ट्या आराखड्यात समावेश नसलेल्या ६४ गावांचा व चिपळूण तालुक्यातील २१ गावांचा येणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये समाविष्ट करून तातडीने अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.

गेल्या वर्षभरापासून जलजीवन मिशनअंतर्गत विविध गावात नळपाणी पुरवठा योजना राबवण्यात येत आहेत. मात्र या योजनेची कामे संथ गतीने सुरू असल्याने ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधींकडून यातील समस्या सोडवण्याबाबत मागणी आ. निकम यांच्याकडे केली होती. त्यावर राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी विविध सूचना केल्या.

## भाजीपाला-फुलशेती बनली उत्पन्नाचे साधन

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

पारंपरिक पद्धतीने भातशेतीचा वसा जपतानाच बाजारात मागणी असलेल्या भाजीपाला, फुलशेतीमधूनही महिन्याला हजारो रुपयांच्या उत्पन्नाचे साधन कसोप (ता. रत्नागिरी) येथील तरुण चेतन साळवी याने निर्माण केले आहे. शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नाही,



अशी मानसिकता बदलण्यासाठी चेतन यांचे शेतकऱ्यांपुढे आदर्शवत उदाहरण ठरले आहे.

गेली दहा वर्ष पारंपरिक भातशेती व भाजीपाला करीत असताना साडेचारशे आंबा कलमे व सत्तर काजू कलमांची लागवड करण्यात आली. त्यातून दरवर्षी उत्पन्न मिळते. त्याचबरोबर तीनशे नारळाची झाडे असून महिन्याला ५०० नारळ मिळतात. त्याचे महिन्याला सहा ते सात हजार उत्पन्न मिळते.

पारंपरिक पाच एकर भात शेतीमध्ये ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करून सुमारे आठ खंडी म्हणजेच चार हजार आठशे किलो भात हमखास मिळते. पावसाळ्यामध्ये भाजीपाला करतो. दोन एकर परिसरात पडवळ, दोडका, कारली, काकडी, मुळा, पालेभाजी याची दरवर्षी लागवड केली जाते. उन्हाळ्यामध्ये वांगी, गवार, भेंडी, पडवळ, दोडका, कारली, काकडी अशाप्रकारे तीन एकर परिसरात लागवड करतो. त्याची विक्री रोज रत्नागिरी बाजारपेठेत ठरलेल्या दुकानदारांना वर्षाच्या बाराही महिने उत्पादन विक्रीसाठी दिले जाते. साखळी पद्धतीने उत्पादन घेतो. भाजीपाल्यातून महिन्याला एक ते दीड हजार रुपयांचे उत्पन्न मिळते.

## देश-विदेश

# कर्नाटकातील महाविद्यालये गोंधळात सुरु

### बुरखाधारी विद्यार्थिनींना प्रवेश न दिल्याने संताप

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

हिजाब वादामुळे आठवडाभर बंद राहिलेली कर्नाटकमधील अनेक कनिष्ठ महाविद्यालये बुधवारी पुन्हा सुरू झाल्यानंतर, बुरखाधारी मुस्लीम विद्यार्थिनींना आत प्रवेश न देण्यात आल्यामुळे तेथे गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अनेक संवेदनशील ठिकाणच्या कनिष्ठ महाविद्यालयांत व त्यांच्या परिसरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



मुस्लीम विद्यार्थिनींच्या एका गटाने बुरखा किंवा हिजाब न काढण्याचा हट्ट कायम ठेवला.

उडुपी जिल्ह्यात कनिष्ठ आणि पदवी महाविद्यालये बुधवारी पुन्हा सुरू झाली. महाविद्यालयांच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आला असून पोलीस तेथे चोख दक्षता बाळगत आहेत.हिजाबवरील बंदीच्या विरोधात कर्नाटक उच्च न्यायालयात दाद मागणाऱ्या ६ मुस्लीम विद्यार्थिनी गैरहजर होत्या, असे उडुपीच्या शासकीय कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रुद्रे गौडा यांनी सांगितले. इतर मुस्लीम विद्यार्थिनींनी वर्गात जाण्यापूर्वी हिजाब काढून ठेवल्याने महाविद्यालयीतल वर्ग सुरळीत सुरू होते.

याच जिल्ह्याच्या कुंदापूर येथील शासकीय कनिष्ठ महाविद्यालयातील ज्या २३ मुस्लीम विद्यार्थिनींनी हिजाब घालण्याचा आग्रह कायम ठेवला होता, त्याही बुधवारी महाविद्यालयात आल्या नाहीत. गेल्या आठवड्यात त्यांनी वर्गात जाण्यापूर्वी हिजाब काढण्यास नकार दिल्यामुळे त्यांना वेगळ्या वर्गात बसवण्यात आले होते. उडुपीतील मणिपाल येथील एमजीएम महाविद्यालयतील वर्ग बुधवारी सुरू झाले नाही. गेल्या आठवड्यात विद्यार्थ्यांच्या गटांनी एकमेकांच्या विरोधात घोषणा दिल्यामुळे येथे अनागोंदी माजली होती. अधिकाऱ्यांनी बुधवारी महाविद्यालयाला सुटी जाहीर केली होती. अज्जारकाड येथील जी. शंकर महिला महाविद्यालयात मुस्लीम विद्यार्थिनींना हिजाब काढून वर्गात जाण्याची परवानगी देण्यात आली.

## बिगर-भाजपशासित मुख्यमंत्र्यांच्या एकजुटीचे प्रयत्न सुरु

। मुंबई । वृत्तसंस्था ।

बिगर-भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या एकजुटीचे प्रयत्न वेगाने सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी रविवारी मुंबईत येणार आहेत. भाजपविरोधात समविचारी पक्षांना संघटित करण्याबरोबरच पुढील दिशा निश्चित करण्यासाठी उभयतांमध्ये चर्चा होणार आहे.

शिवसेनेने मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन भाजपच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तेलंगणचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून भेटीला येण्याचे निमंत्रण दिले. ठाकरे यांच्या निमंत्रणानुसार राव हे रविवारी मुंबईत येणार असल्याची माहिती तेलंगणच्या मुख्यमंत्री कार्यालयातून देण्यात आली.

ठाकरे यांनी चंद्रशेखर राव यांना भोजनाचे निमंत्रण दिले आहे. राव यांनी भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. भाजपच्या दडपशाहीविरोधात बिगर-भाजपशासित राज्यांनी एकत्र यावे, यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. चंद्रशेखर राव यांनी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के.स्टॅलिन, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला होता. माजी पंतप्रधान व धर्मनिरपेक्ष जनता दलाचे सर्वेसर्वा एच. डी. देवेगौडा यांनीही राव यांना पाठिंबा जाहीर केला आहे. बिगर-भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची लवकरच नवी दिल्लीत बैठक होणार आहे.

## फुटपाथ धारकांना तात्पुरता दिलासा

### प्रशासनाशी चर्चा होईपर्यंत अतिक्रमण हटाव मोहिम स्थगित

। गडचिरोली । प्रतिनिधी ।

गडचिरोली हा उद्योग विरहित जिल्हा असून पोटभरण्याच्या उद्देशाने खेड्यातील गरीब लोकांनी गडचिरोली शहरात फुटपाथवर दुकाने सुरू केलेली आहेत. ही फुटपाथ दुकाने अत्यंत बळजबरीने आणि एकतर्फी, द्वेषभावनेतून करण्यात येत असून पर्यायी व्यवस्था होईपर्यंत सदर कारवाई थांबविण्यात यावी यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे नगर परिषदेवर मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर फुटपाथ धारक चर्चा करण्यासाठी नगर परिषद कार्यालयात गेले असता सदर हटाव कारवाई नगर परिषद प्रशासनाशी चर्चा होईपर्यंत स्थगित करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आल्याने तात्पुरती दिलासा मिळाला आहे.

शेकापक्षाने नगर परिषदेवर गेलेल्या मोर्चेकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर रात्री १२.३० वाजता पर्यंत फुटपाथ धारकांसह शेकापक्षाचे नेते भाई रामदास जराते, शामसुंदर उराडे, देवेंद्र चिमनकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. अमोल मारकवार, निखिल धार्मिक,



बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड, मिलींद बांबोडे, विवेकराजे बारसिंगे यांचेसह फुटपाथ धारकांनी पोलीस ठाण्यातच ठिय्या मांडला होता.

दरम्यान शेकापक्षाचे नेते भाई रामदास जराते, शामसुंदर उराडे, राज बन्सोड, मिलींद बांबोडे, विवेक बारसिंगे, रवींद्र वासेकर, विजय गोरडवार,सतिश विधाते यांच्या उपस्थितीत शेकडो फुटपाथ धारकांनी नगर परिषद कार्यालय गाठले असता नगर परिषद प्रशासन सोमवारी दुपारनंतर फुटपाथ धारक आणि सर्वपक्षीय शिष्टमंडळाशी चर्चा करण्यास तयार असून चर्चा होईपर्यंत अतिक्रमण हटाव मोहिम स्थगित करण्यात येत असल्याचे पोलीस विभागाच्या समक्ष जाहीर केले. त्यामुळे गडचिरोली शहरातील फुटपाथ धारक दुकानदारांना तात्पुरती दिलासा मिळाला आहे.

नगरपरिषद, गडचिरोली ने कारगील चौकात बांधलेले १०० दुकानगाळे शहरातील फुटपाथ धारकांना 'ड्रॉ' पद्धतीने देण्यात यावेत. यात १०% गाळे नक्षलपिडित कुटुंबीय फुटपाथ धारकांना देण्यात यावेत. गडचिरोली जिल्ह्यात कोणताही मोठा उद्योग नसल्याने शहरातील अतिक्रमण धारक फुटपाथ धारकांना पर्यायी जागेची व्यवस्था करुन उपजिविकेची हमी देण्यात यावी. गडचिरोली शहरातील चारही प्रमुख महामार्गावर सर्वीस रोड तयार करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांच्या संबंधाने सोमवारी दुपारनंतर चर्चा होणार आहे.

## मुलींचा घटता जन्मदर चिंताजनक

। बीड । वृत्तसंस्था ।

बीड जिल्ह्यातील मुलींचा घटलेला जन्मदर चिंताजनक असून कोरोनाच्या काळात मुलगाच हवा या हव्यासापोटी गर्भलिंग तपासणीचे प्रमाण वाढले. प्रशासकीय यंत्रणाही कोरोना विषाणू संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याच्या उपाययोजनेत व्यस्त होती. त्यामुळेच मुलींचा जन्मदर घटला, अशी कबुली वैद्यकीय गर्भावस्था समाप्ती कायदा आणि गर्भधारणा पूर्व, प्रसवपूर्व निदानतंत्र राज्य पर्यवेक्षक मंडळाच्या अशासकीय सदस्या डॉ. आशा मिरगे यांनी बुधवारी दिली.

मुलींचा जन्मदर वाढविण्याच्या दृष्टीने एक व्यापक चळवळ हाती घेण्यात येणार असून पुढील पंधरा दिवसात त्याचा आराखडा तयार करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्याचे डॉ. मिरगे म्हणाल्या.

बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सोनोग्राफी, गर्भपात केंद्र तपासणी आणि जिल्हा सल्लागार समितीची आढावा बैठक पार पडली. त्या बैठकीनंतर डॉ. मिरगे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी सदस्या वैशाली मोटे, शल्यचिकित्सक डॉ. सुरेश साबळे उपस्थित होते.

# ढोकशेत धरण क्षेत्रात अनधिकृत उत्खनन


## २ कोटी ३६ लाखांचा दंड ; महसूल, पाटबंधारे विभागाची नोटीस

**। सुधागड -पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरण क्षेत्रात एका खाजगी विकसकाने अनधिकृत उत्खनन व बांधकाम केले आहे. याबरोबरच धरणामध्ये भराव देखील केला आहे. यामुळे धरणातील पाणी जाण्याचा मार्ग देखील बंद झाला आहे. यासंदर्भात सुधागड पाली महसूल विभागाने विकासकांवर २ कोटी ३६ लाख ६४ हजार ६२० रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर पाटबंधारे विभागाने देखील धरणात केलेला भराव काढण्यासाठी नोटीस बजावली आहे.

धरण क्षेत्रातील अनधिकृत उत्खनन, भराव व बांधकामाविषयी सामाजिक कार्यकर्ते सागर मिसाळ यांनी सुधागड महसूल विभाग व पाटबंधारे विभाग कोलाड येथे तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार ही कारवाई झाली आहे. सागर मिसाळ यांनी याबाबत निवेदन सादर केलेले आहे. तक्रारी निवेदनात म्हटले आहे की, ढोकशेत गट सर्व्हे नंबर ४३२ मध्ये शेतघर बांधण्याचे काम सुरू असून सपाटीकरणाच्या नावाखाली अनधिकृत उत्खनन करण्यात आले आहे. ही जागा ढोकशेत धरणाला लागून असल्याने ढोकशेत धरणामध्ये अनधिकृतरित्या भराव करण्यात आला आहे.

तसेच धरणामधून बाहेर जाणारा पाण्याचा प्रवाह देखील मातीचा भराव करून बुजवण्यात आला आहे व कच्चा मार्ग करण्यात आला आहे. ही जागा पाटबंधारे विभाग यांच्या अधिकाराखाली असतांना तेथे अशा प्रकारे अनधिकृत भराव होत असूनही पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत आहे. असे निवेदनात म्हटले आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्थळ पाहणी करण्यात यावी असे म्हटले आहे. तसेच काही ठिकाणी वृक्षतोड झाल्याने वन विभागाने देखील येथे लक्ष द्यावे. या अनधिकृत उत्खननासाठी महसूल विभागाने जवळपास २ कोटी ३६ लाख रुपये दंडाची नोटीस पाठवली आहे. मात्र सुधागड महसूल विभागाच्या माध्यमातून किती दंड वसुली झाली याचीही चौकशी व तपासणी करण्याची विनंती निवेदनात केली आहे.



■ पाली, ढोकशेत धरण क्षेत्रात सुरू असलेले अनधिकृत भराव व काम. (छायाचित्र : गौसखान पठाण)

> ढोकशेत येथे एका विकासकाने महसूल विभागाची कोणतीच परवानगी न घेता अनधिकृतरित्या उत्खनन व भरावाचे काम केले आहे. या ठिकाणी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासोबत प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. याबाबत सुधागड महसूल विभागाने त्यांना २ कोटी ३६ लाख ६४ हजार ६२० रुपये दंड ठोठावला आहे.
>
> –दिलीप रायणावार, तहसीलदार, पाली–सुधागड

# पेणमधील अनधिकृत बांधकामांवर कारवाई नाही

## तलाठ्याच्या पंचनाम्यानंतरही तहसील कार्यालयाचा कानाडोळा



**। पेण । वार्ताहर ।**

पेण शहर आणि परिसरात होत असलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत तलाठ्यांनी पंचनामा करुनही तहसील कार्यालयाकडून अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आल्याचे दिसत नाही. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षतेमुळे इतिहासाचा ठेवाही नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे दिसत आहे.

पेण शहराच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात अनाधिकृत रित्या भरावाची कामे सुरू आहेत. मात्र पेण तहसिलदारांचेत्याकडेदुर्लक्षहोतआहे. सदर भरावांच्या बद्दल पेण तलाठ्यांशी संपर्क साधला असता. त्यांनी पेणच्या आजूबाजूला झालेल्या अनधिकृत भरावाचे पंचनामे करून वरिष्ठांकडे पाठविले आहेत. तसेच खास करून भोगावती पुलाच्या तीरावर झालेल्या भरावाचा देखील पंचनामा केला असल्याची माहिती दिली. त्यानंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी भोगावती पुलावर जाऊन पाहणी केली असता जो भराव झालेला आहे तो भराव मोठ्या प्रमाणात झाला असून काही प्रमाणात नदीत देखील भराव झाल्याचे प्रथम दर्शनी दिसत आहे. त्याचप्रमाणे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गापासून भुंड्या पुलावर जाण्यासाठी पूर्वपार रस्ता (गवण) होती. या रस्त्यांनी सहज रित्या बैलगाडी जात असत. आणि जुन्या नकाशामध्ये आज ही या गवणीचा उल्लेख आहे. ती कुणाच्या मालकीची नसून वहिवाटीची व रहदारीची होती.

महत्वाची बाब म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या वेळेला कापुर बागेत मीठाच्या सत्याग्रहासाठी बैठक बोलावली होती त्या वेळेला स्वातंत्र्य सैनिकांनी याच गवणीचा उपयोग केल्याचे दाखले आजही इतिहासात आहेत. मात्र लक्ष्मी दर्शनाने हुरळून गेलेल्या दोन वर्षासाठी अधिकारी म्हणून येणाऱ्या व्यक्तींना पेणच्या इतिहासाचे काही पडले नाही. या गवणीत देखील मोठ्या प्रमाणात भराव टाकून गवण बंद करण्यात आलेली आहे. भरावाच्या उंचीचा विचार करता १५ ते २० फूटांची उंची असून एक ते दिड एकरात भराव झालेला आहे. याच्या स्वामित्व कराचा विचार करता लाखो रुपयांचा स्वामित्व कर भरावा लागणार. हा भरला आहे की नाही ती ही माहिती उपलब्ध होत नाही. तसेच पशुसंर्वधन कार्यालयाच्या समोर ज्याप्रमाणात भराव झालेला आहे ते पाहता एकतर पेणचे महसुल अधिकारी झोपलेले आहेत अथवा झोपेचे सोंग घेत आहेत की राष्ट्रीय महामार्गाच्या कडेलाच एवढ्या मोठ्या प्रमाणात भराव सुरु असताना ती बाब दिसत नाही. हे न पटण्यासारखे एक कोडे आहे.

# बेटी बचाओ-बेटी पढाओ ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन भाजप महाराष्ट्र प्रदेश प्रकोष्ठकडून करण्यात आले आहे. या स्पर्धेचा उद्देश युवा वर्गात बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाविषयी जागृती निर्माण करणे हा आहे. प्रथम पारितोषिक रू. २१, हजार, द्वितीय पारितोषिक रू. ११ हजार, तृतीय पारितोषिक रू.७ हजार तसेच उत्तेजनार्थ पारितोषिकेही दिली जाणार आहेत. स्पर्धेचे विषय १) आजची पिढी, तंत्रस्नेही पिढी. २) विचार मंथन-लग्नाचे वय २१. ३) सृजनकर्ती मी, तरी अजूनही असुरक्षित मी. ४) भारतीय स्त्री, आत्मनिर्भर स्त्री. ५) मुलगी देशाची शान, प्रत्येक घराचा सन्मान असे असून १६ ते २५ वर्षे वयोगटातील मुले-मुलींसाठी असलेली ही खुली स्पर्धा आहे. स्पर्धेसाठी भाषा माध्यम मराठी, हिंदी, इंग्रजी पैकी एक निवडायचे असून स्पर्धा कालावधी २४ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२२ पर्यंत आहे. यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग ३ ते ५ मिनिटांचे असावे तर व्हिडिओ साईज ५० ते ६० मेगाबाईटस्पेक्षा जास्त नसावी. स्पर्धकाचे नाव, जन्म तारीख, संपर्क क्रमांक, राहता पूर्ण पत्ता तसेच स्पर्धकाचे आधारकार्ड अशी माहिती जोडायची आहे. सदर व्हिडिओ आणि माहिती फक्त ईमेलद्वारे पाठवायचे असून अधिक माहितीसाठी निलिमा राजय भोसले- ९१३००१६९६७ आणि अतुल प्रजापती- ९८३३२९६६२२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन सपना सचिन बुटाला यांनी केले आहे.

## म ह त्वा चे

### संत रविदास यांना अभिवादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

संत रविदास महाराज जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन केले. यावेळी तहसीलदार विशाल दौंडकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### अध्यक्षपदी मच्छिंद्र म्हात्रे

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण मराठी साहित्य परिषद उरण शाखेच्या पदाधिकाऱ्यांची निवड रंजना केणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत करण्यात आली. यावेळी रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील, लोकशाहीर मोरेश्वर म्हात्रे, संग्राम तोगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, कार्याध्यक्षा रंजना केणी, जिल्हाप्रतिनिधी संजय होळकर, उपाध्यक्ष चेतन पाटील, सचिव भ.पो. म्हात्रे, सुजीत डाकी, मार्गदर्शक रायगडभूषण प्रा.एल.बी. श्रीधर पाटील, लोकशाहीर मोरेश्वर, शोभा जोशी, प्रदिप मुंबईकर इत्यादींची निवड झाली. यावेळी कार्यकारिणीने करावयाच्या कामांची रूपरेषा ठरविण्यात आली. यावेळी भरत पाटील, तानाजी भोईर, राजेश पाटील यांची उपस्थिती होती. उपस्थितांचे आभार अमोल म्हात्रे यांनी मानले.

### जिते येथे ब्लँकेटचे वाटप

**। कर्जत । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिते यांच्यावतीने ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी वंदना हजारे, अक्षय जाधव, विकास शेळके, विक्रम घरत, मयुर जाधव, आकाश शेळके, निशांत जाधव, प्रसाद घरत, सचिन हजारे, राहुल घरत, दर्शन ठाकरे, मनोज घरत, निलेश घरत, अमित गायकवाड, मनिष जाधव, सतिश जाधव, धिरेश जाधव, तेजस पवाली, रोहित हजारे, वामन वाघमारे, मंगेश मुकणे, पिंट्या मुकणे, राजेंद्र जाधव, मोहित जाधव, रोनित जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोखले महाविद्यालयात व्याख्यानमाला

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील गोखले महाविद्यालयात सोसायटीचे सचिव डॉ.एम.एस.गोसावी यांच्या ८७ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशींच्या कल्पनेतून आणि महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापकांच्या सहकार्याने ही व्याख्यानमाला यशस्वीपणे पार पडली.

संगमनेरच्या डॉ.संध्या खेडेकर, एस. एस. धामणकर, प्रा.विद्या कुलकर्णी, डॉ. सुनील जोशी, डॉ. मेधा तापियावाला, प्रा. डॉ.अंजली कुलकर्णी, प्रा.जितेंद्र भामरे आदी मान्यवरांनी विविध विषयांवर आपले मनोगत व्यक्त केले.

डॉ. एम. एस. गोसावी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केल्याबद्दल प्रा.एस. बी. पंडित, प्रा. डॉ.दिप्ती देशपांडे, प्रा. डॉ. सुहासिनी संत, प्रा. डॉ. एम.आर.मेश्राम, नितीन सुर्वे, शांतीलाल जैन, राजेंद्र भोसले यांनी या व्याख्यानमालेचे कौतुक केले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी निलेश चव्हाण, डॉ. कल्याणी नाजरे, किशोर लहारे, दिपाली पाठराबे, राजू गोरुले, शंकर भोईर, मृण्मयी भुसाणे, नवज्योत जावळेकर, सागर कुंभारे यांनी परिश्रम घेतले.

# १००० आदिवासी बांधवांना दाखले वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

महसूल विभाग पनवेल आणि उरण सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कर्नाळा ग्राम पंचायत हद्दीतील एकूण सात आदिवासी वाड्या एकत्र करून काही दिवसांपूर्वी आखाडा वाडीवर कॅम्प आयोजित करण्यात आला होता. त्या सर्व आदिवासी बांधवांचे जातीचे दाखले तयार करून ते व्यवस्थित लॅमीनेशन करून त्याचे वाटप करण्यात आले.



भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या कातकरी उत्थान अभियाना अंतर्गत सुरू असलेल्या सप्तसुत्री कार्यक्रमाचे औचित्य साधून आज जातीचे दाखले वाटप करण्यात आले. त्या वेळेस बोलताना राहुल मुंडके यांनी आदिवासी बांधवांना शिक्षणाकडे लक्ष देण्याची सूचना केली व भविष्यात असा दिवस येईल की तुमच्यातील एक व्यक्ती शिकून मोठा अधिकारी बनून येथे जातीचे दाखले वाटप करण्यासाठी येईल. तसेच त्यांच्या कार्यकाळात जे काही सहकार्य लागेल ते करण्याचे आश्वासन दिले. तहसीलदार विजय तळेकर यांनी सरकारी योजनांचा लाभ कसा मिळवावा याचे मार्गदर्शन केले. उरण सामाजिक संस्थेचे संतोष पवार यांनी जातीच्या दाखल्याचे महत्त्व समजावून सांगितले.

# नेरळ शहरात चोरीच्या घटनात वाढ

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील मोडक नगर येथील सोसायटीमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरी झाल्याची घटना घडली आहे.२६ हजार रोख रक्कम तर सोन्याचे कानातले दागिने चोरीला गेले आहेत. याबाबत आता नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या नेरळ चिंचआळी येथील मोडक नगर या भागातील एका सोसायटीत मंगळवार १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारास ही घटना घडली होती. येथील श्री समर्थकृपा अपार्टमेंट येथे पहिल्या मजल्यावर राहणारे गणेश वेहले यांच्या घरात कोणी नसताना अज्ञात चोरट्यानी घराच्या दाराचे कडी कोयनडा तोडून घरातील कपाटातील रोख रक्कमेसह कानातील सोन्याचे दागिने चोरून चोर पसार झाला होता.

# नवनिर्वाचित नगराध्यक्षा, नगरसेवकांचा सत्कार

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका दिव्यांग(अपंग) संघटनेच्यावतीने नवनिर्वाचित नगरसेवक नगरसेविकांचा अध्यक्ष किशोर पितळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा अस्मिता भोरावकर, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे नगरसेविका अर्चना तांबे,पुष्पा नागे, यामिनी म्हेतर, ग्रिष्मा बामणे, माधुरी घोलप, नगरसेवक अविनाश पिसाळ तसेच विजय तांबे, चंद्रकांत भोरावकर शैलेश घोलप, गणेश बामणे कार्यकर्ते संघटनेचे पदाधिकारी सदस्य पाडगे उपस्थित होते.

# विविध विकास कामांचा आयुक्तांनी घेतला आढावा

**॥ पावतीमुक्त महापालिका करणार**

**॥ निविदा प्रक्रियांचे काम पूर्ण करण्याचा निर्धार**

**। पनवेल । वार्ताहर ।**

सिडकोकडून मिळालेल्या भूखंडाचा विकास करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या विविध विभागांनी वेगाने कामास लागावे अशा सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी १६ जानेवारी रोजी झालेल्या विभागप्रमुखांच्या बैठकीत संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर प्राथमिक सुविधांवरती काम केल्यावरती यापुढे सिडकोकडून मिळालेल्या भूखंडाचा विकास करण्याच्या दृष्टीने बांधकाम विभाग तसेच संबंधित विभागांनी तातडीने कामे पूर्ण करावीत अशा सूचना आयुक्तांनी बैठकीत दिल्या. यामध्ये प्रशासकीय इमारत, महापौर बंगला, प्रभाग समिती कार्यालये यांच्या निविदा प्रक्रियांचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे यादृष्टीने आयुक्तांनी सूचना दिल्या. याचबरोबर क्रिकेट प्रशिक्षण केंद्र, वसतिगृहे, दफनभूमी या कामांचा आढावा आयुक्तांनी घेतला.



सध्या पॉस मशीनद्वारे विविध प्रकारचा दंड भरला जात असला तरी येत्या एप्रिल महिन्यापासून कोणतेही पावती पुस्तक न छापता सर्व पावत्या पॉस मशिनद्वारे करण्याच्या दृष्टीने लेखा विभागाला आयुक्तांनी सूचना दिल्या. या माध्यमातून पावती मुक्त महापालिका करण्यात येणार असल्याचे सांगितले. येत्या आठ मार्चला 'जागतिक महिला दिन' आहे. त्यादृष्टीने संबधित विभागास विविध सूचना आयुक्तांनी दिल्या. तसेच शिवजयंती विषयक कामाचा आढावा घेतला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, नगररचना सहाय्यक संचालक ज्योती कवाडे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, लेखाधिकारी डॉ. संग्राम व्होरकाटे तसेच सर्व विभागप्रमुख, खातेप्रमुख या बैठकीस उपस्थित होते.

## क्लासिफाईड


*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर– ८००७४५२१४६
- ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स,Investomax कामत आळी, अलिबाग– ७७४४०८८४०४
- अलिबागमध्ये ११८३ Sqft फ्लॅट विकणे आहे. संपर्क : ९६८९७६७७०७
- अलिबागमध्ये हार्डवेअरच्या दुकानात कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क– ०२१४१-२९५१११/९४२२६९०८५४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणच्या कचऱ्याला घोट ग्रामस्थांचा विरोध

## शेकापचा संघर्ष करण्याचा इशारा



**। पनवेल । वार्ताहर ।**

अगोदरच पनवेलच्या कचऱ्यामुळे राहणे नकासे झालेल्या घोट ग्रामस्थांना आता उरणच्या कचऱ्याचा दर्पही सहन करावा लागणार आहे. त्यामुळे घोट ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. प्रसंगी रस्त्यावर संघर्ष करण्याचा इशारा भारतीय शेतकरी कामगार पक्षाने दिला आहे. उरण येथील कचरा पनवेल तालुक्यातील घोट गावालगतच्या सिडकोच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात विघटन करण्यात येणार असल्याने ग्रामस्थ एकवटले आहेत.

या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची क्षमता पुढील काही वर्षांत संपणार आहे. पनवेल पालिकेने इतर ठिकाणी स्वत:च्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करावे असा हट्ट सिडकोने धरला आहे. पनवेल पालिकेला हा प्रकल्प उभारण्यासाठी अद्याप जमीन मिळालेली नाही. पनवेलकरांचा कचरा प्रत्येक सिडको वसाहतींमध्ये व्यवस्थापन करावा असे सुद्धा नियोजन सिडकोने केले होते. मात्र या नियोजनाला तेवढा प्रतिसाद मिळाला नाही. त्या दरम्यान पनवेल नगरपरिषदेचा विस्तार महापालिकेत झाल्याने सिडको वसाहतींचा कचरा व्यवस्थापन हा प्रश्न सूटू शकला नाही. पनवेल तालुक्यातील गावांसाठी शासनाने सिडकोच्या नैना प्राधिकरणाला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार दिले आहेत. मात्र येथील कचरा उचलला जात नाही. येथील ग्रामपंचायतींना कचऱ्याचे नियोजन करावे लागत आहे. अनेक गावांत कचरा जाळणे हाच सोपा मार्ग निवडला जात आहे

> आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाला सामोरे जात आहोत. सिडकोचे अधिकारी सांगतात प्रकल्पातून कोणताही दर्प येत नाही. आम्ही त्यांना आमच्यासोबत गावात एकरात्र राहण्याची विनंती केली आहे. मानवतेच्या दृष्टिकोनातून आमच्या भावना पनवेल व उरणच्या प्रशासनाने समजावून घ्यावी. प्रत्येक शहरातील व गावातील ग्रामस्थांनी त्यांचा कचरा त्यांच्या गावाशेजारी व्यवस्थापन केल्यास आमच्या गावावरील भार कमी होईल.
>
> – ज्ञानेश्वर पाटील, नगरसेवक, शेकाप

# बाळसई येथे शिवजयंतीचे आयोजन

**। सुकेळी । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराजांची ३९२ वी जयंतीनिमित्त शनिवारी श्री. आई बेलजाई मित्र मंडळ बाळसई व ग्रामस्थ मंडळ बाळसई यांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. हे या मंडळाचे ५ वे वर्ष आहे. या कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच सकाळी ९ वाजता किल्ले रायगडाहुन बाळसई येथे शिवज्योतीचे आगमन होईल. त्यानंतर ध्वजारोहण श्री. शिवप्रतिमेचे पूजन झाल्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत हळदी कुंकु कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ वा. भव्य मिरवणूक सोहळा पार पडल्यानंतर शेवटी रात्री ८ वाजता श्री.छत्रपती शिवाजी महाराजांची आरती झाल्यानंतर सर्वांना स्नेहभोजन देऊन या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

# मोफत आरोग्य तपासणी शिबीर




**। माथेरान । वार्ताहर ।**

युवाक्रांती पोलीस मित्र संघटना तसेच लाईफ केअर डेग्नोस्टिक यांच्या तर्फे माथेरान पोलीस स्टेशनमध्ये मोफत रक्त व इतर तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे सर्व पोलीस अधिकारी तसेच बाकी इतर सरकारी कर्मचारी व सफाई कामगार यांचे मोफत तपासणी करण्यात आल्या.पोलीस मित्र संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रितेश बोंबे, सतीश बर्गे, सुशांत पाटील हे उपस्थित होते. विविध खात्यातील अधिकारी वर्गाला शासकीय कामातून अनेकदा आजार उद्भवतात. कामाच्या व्यापात त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते.

याकामी युवक्रांती पोलीस मित्र संघटना तसेच लाईफ केअर डेग्नोस्टिक यांच्या तर्फे माथेरान पोलीस स्टेशन परिसरात मोफत रक्त व इतर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

र्व शासकीय अधिकारी कर्मचारी वर्गाने उत्स्फूर्त पणे प्रतिसाद देत हे आरोग्य शिबीर यशस्वीपणे पार पाडले यासाठी सतीश बर्गे यांच्यासह संबंधित सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संत रोहिदास प्रतिमेचे अनावरण



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील मांडला ग्रामपंचायतीत संत रोहिदास जयंती निमित्ताने संत रोहिदास यांच्या प्रतिमेचे अनावरण चर्मकार संघटनेचे तालुकाध्यक्ष सुरेश नांदगावकर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रभाकर महाडिक, संदीप नागावकर, प्रफुल रोहेकर, गणेश पालकर ,विजय रोहेकर, दत्तात्रय नागावकर, रवींद्र पालकर, सुचिता पालवणकर , राजेश पाटील, धर्मेंद्र गायकवाड, अनिता नांदगावकर, बशीर गोरमें, शैलेश रातवडकर, सुरेश पालवणकर, परशुराम मुरुडकर, पांडुरंग घोसाळकर बारावी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# आदिवासी शासकीय वसतिगृहासाठी साडेबारा कोटी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शासनाने पाली येथे आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह उभारण्यासाठी १२ कोटी ५० लक्ष रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांनी सुधागड येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे प्रस्ताव सादर केला होता.या कामाची सुरुवात होणार असून याकरिता या आर्थिक वर्षात रु.१ कोटी २५ लक्ष, पुढील वर्षी रु.५ कोटी २५ लक्ष तर त्यापुढील आर्थिक वर्षात रु.६ कोटी खर्च अपेक्षित आहे.

## जाहीर नोटीस दिनांक १८/०२/२०२२

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री.विजय आत्माराम पाटील व सौ. पुजा परेश धरणेकर यांनी मौजे हेदवली ता.कर्जत जि.रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| सौ.उर्मिला लक्ष्मण पाटील | ७९ | २ | ०-३८-० | ०-३४ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरूपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही व असल्यास ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत असे समजून कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड.प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.'मातोश्री' निवास आवळस, ता.कर्जत,जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र.०९८८१५७९५५५

## अल्प मुदतीची कोटेशन सूचना

ग्रा.पं.शहाबाज ता.अलिबाग, जि.रायगड येथील १५ वा वित्त आयोग सन २०२०/२१ निधीतून खालील नमूद प्रशिक्षण हाती घेतली आहे. तरी सदर प्रशिक्षण करणेसाठी नोंदणीकृत/अनुभवी संस्थेद्वारे मोहोरबंद लिफाफा कोटेशन मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी | कोटेशन सादर करण्याची अंतिम तारिख ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय सादर | इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महिला बचत गट सदस्यांना संगणक प्रशिक्षण देणे | ७०००० | ३ महिने | २४/०२/२०२२ | ७०० | १०० |
| २ | मागावर्गीय मुलींना महिलांना संगणक प्रशिक्षण देणे | २००००० | ३ महिने | २४/०२/२०२२ | २००० | १०० |

**अटी-**
१. प्राप्त कोटेशन दि.२५/०२/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात येथे उपस्थितांचे सक्षम मा.सरपंच यांचे हस्ते उघडणेत येतील.
२. कोणतीही एक अथवा अनेक कोटेशन कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
३. देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर,विमा, जीएसटी, सुरक्षा, अनामत, सेस व उपकराची रक्कम कपात केली जाईल.
४. संस्थेला निधिप्रमाणे रक्कम अदा केली जाईल.
५. कोटेशन पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली कोटेशन स्विकारली जाणार नाही.
६. कोटेशन फॉर्म फी ना परतावा समजावी.
७. कोटेशन मंजूर केल्यास १०० रु. स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करून द्यावा लागेल.

सही/- **ग्रामसेवक अधिकारी** ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज

सही/- **सरपंच** ग्रुप ग्रामपंचायत शहाबाज

## ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड
## मु.पो.पोयनाड, ता.अलिबाग,जि.रायगड
### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड कडून स्वच्छ भारत मिशन अंतर्गत खालील काम करण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाची मुदत/महिने |
|---|---|---|---|
| १ | पोयनाड मच्छीमार्केट येथे ४ शीट शौचालय बांधणे | ३०००००/- | |

**अटी व शर्तीः-**
१) निविदा/दरपत्रके मोहोरबंद पाकीटात मा.सरपंच ग्रामपंचायत पोयनाड यांचे नावे दि.१८/०२/२०२२ ते दि.२५/०२/२०२२ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १० ते १ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२) ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील स्थानिक ठेकेदाराचा विचार केला जाईल.
३) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
४) कोणत्याही नामंजूर निविदा/दरपत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
५) सदर कामाची अंदाजपत्रक ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील.
६) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
७) या कामासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.
८) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके दि.२५/०२/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा.ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**श.दि.काकडे**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत, पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
### ODF++ जाहीर आवाहन

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये ODF++व GFC ५ स्टार रेटींग करीता दिलेल्या निकषानुसार अलिबाग नगरपरिषद, अलिबाग शहरात ODF++व GFC ५ स्टार रेटींगबाबत अलिबाग नगरपरिषद हद्दीमध्ये ८ प्रभाग ODF++व GFC ५ स्टार रेटींग म्हणून घोषित करण्यात येणार आहे. याकरीता अलिबाग नगरपरिषदेने मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८२५ दिनांक २३-०९-२०२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्व्हिस लेवल बेंचमार्क (SLB) बाबत अलिबाग शहरात पुरविल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा हा महत्वाचा घटक असून सदरच्या सेवा अलिबाग नगरपरिषद पुरवित आहे. तरी सर्व्हिस लेवल बेंचमार्क (SLB), ODF++व GFC ५ स्टार रेटींगविषयी माहिती आणि त्याबाबत आपल्याला काही हरकती व सूचना असल्यास ते लेखी स्वरुपात हे जाहीर आवाहन प्रसिद्ध झालेपासून पुढील १० अलिबाग नगरपरिषदेच्या कार्यालयात सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती आणि सूचना यावर विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने आमचे अशील श्री.विलास विठोबा पाटील, रा.वडखळ, ता.पेण जि.रायगड व नेरूळ, नवी मुंबई यांचे मार्फत कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी, (म्हात्रोळीपाडा), पो.सारळ, ता.अलिबाग, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या मिळकती या आमच्या अशीलांच्या ताबेकब्जा वहिवाटीच्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| क्र. | मौजे | गट न | हि.नं. | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | म्हात्रोळी (म्हात्रोळीपाडा) | २१० | १ | ०-२८-० ०-०१-५ | ६-५० |
| २ | म्हात्रोळी (म्हात्रोळीपाडा) | २१० | २ | ०-१७-१ ०-०१-० | ४-०६ |

वरील वर्णनाच्या मिळकती विकत घेण्यासंदर्भात आमच्या अशीलांनी प्रभाकर नाना नाईक व कमळाकर नाना नाईक यांचेसोबत दि.२४/०४/२००६ रोजी साठेकरार केलेला आहे. सदर मिळकती व्यतिरिक्त गट नं.२१४ ही मिळकत देखील साठेकराराचा विषय होती, तिचे बाबत खरेदीखत झालेले आहे. उर्वरीत वरील २ मिळकतींचे खरेदीखत होणे अद्यापी बाकी आहे. साठेकराराच्या दिवशीच आमचे अशीलांस वरील मिळकींचा ताबा प्रभाकर नाईक व कमळाकर नाईक यांनी दिलेला आहे व तेव्हापासून वरील मिळकतींचा आमचे अशील उपभोग घेत आहेत.

काही दिवसांपूर्वी कमळाकर नाईक यांचे निधन झालेले आहे. वरील मिळकतींचे खरेदीखत आमचे अशिलांचे लाभात करून देण्याकरिता आवश्यक बाबी पूर्ण करण्याची जबाबदारी प्रभाकर नाईक व कमळाकर नाईक यांचीच व त्यांच्या वारसांची देखील आहे. असे असतानाही आमचे अशीलांचे हक्क डावलण्याच्या हेतूने वरील मिळकती आमच्या अशीलांस विक्री करण्याऐवजी आमच्या अशिलांची फसवणूक करून संबंधीत इसम मिळकती अन्य इसमास विक्री करण्यास निघाले आहेत, त्यापैकी गट नं.२१०, हि.नं.२ या मिळकतीबाबत हरकत मागवणारी नोटीस देखील जमिन विकत घेवू इच्छीणाऱ्या व्यक्तीने वकीलांमार्फत प्रसिद्ध केलेली आहे, त्यास आमचे अशीलांनी योग्य ती हरकत घेतलेली आहे. मात्र प्रभाकर नाईक व कमळाकर नाईक यांचे वारस आमचे अशिलांन सोबत झालेल्या साठेकराराची माहिती न देता तसेच मिळकत आमचे अशिलांचे ताब्यात आहे हे लपवून विक्री करण्याची शक्यता आहे, त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. आमचे अशिल प्रभाकर नाईक व सुनिल नाईक, वगैरे यांच्या विरूद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत.

तरी या नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी (म्हात्रोळीपाडा) येथील गट नं.२१०, हि.नं.१, तसेच गट नं.२१०, हि.नं.२ या मिळकतींबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार प्रभाकर नाईक, सुनिल नाईक, सविता संदेश नाईक अथवा मनोज कमळाकर नाईक यांचेसोबत करू नये, केल्यास तो बेकायदेशीर होईल व आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही तसेच आमचे अशील मिळकतींचा ताबा कोणासही देणार नाही याची नोंद सर्वांनी घ्यावी.

दि.१७/०२/२०२२

सही/-
ॲड.प्रविण मधुकर ठाकूर
जिल्हा व सत्र न्यायालय
रायगड-अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**मुख्य संपादक**

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-४०-६० आर्स शेतजमिन मिळकत, श्रीमती लिलावती विनोद मोमया, राहणार मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकतीपैकी ०-०७-०० आर्स शेतजमिन मिळकत श्री. अशोक चिमणलाल श्रॉफ, राहणार मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची आहे, तर सदर मिळकतीपैकी ०-०५-६० आर्स शेतजमिन मिळकत श्री. सुरेंद्र अरूण अभ्यंकर व श्रीमती संपदा श्रीनिवास ठोसर राहणार मुंबई, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खाली परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतींवरील श्रीमती लिलावती विनोद मोमया, श्री. अशोक चिमणलाल श्रॉफ, श्री. सुरेंद्र अरूण अभ्यंकर व श्रीमती संपदा श्रीनिवास ठोसर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग. | ९२६ | ० | ०-५०-६० ०-०२-६० पो.ख. ०-५३-२० एकूण | ११-०९ |

सदर मिळकतीपैकी ०-४०-६० आर्स मिळकत श्रीमती लिलावती विनोद मोमया यांच्या मालकीची आहे. तसेच ०-०७-०० आर्स मिळकत श्री. आोक चिमणलाल श्रॉफ यांच्या मालकीची असून, ०-०५-६० आर्स मिळकत श्री. सुरेंद्र अरूण अभ्यंकर व श्रीमती संपदा श्रीनिवास ठोसर यांच्या मालकीची आहे.

अलिबाग,
दिनांक : १७/०२/२०२२

सही/-
**(ॲड. संजय म.भगत )**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची गावठाण मिळकत व त्यामध्ये असलेले घर कंम्पाउंड सहित, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रदीप दिवाकर पाटकर यांच्याकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तसा जमिन मालकांबरोबर साठेकरारसुद्धा झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**अ. गावठाण मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्र (चौ.मीटर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आंबेपूर, ता.अलिबाग जि.रायगड | ११७६ | ७१८.४० | - |
| आंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड | ११७७ | ३०३.८० | - |

**ब. घर मिळकतीचे वर्णन**

| मौजे | घर नंबर | क्षेत्र (चौ. फुट) | असेसमेंट (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आंबेपूर, ता.अलिबाग जि. रायगड | ३५० | ३४ X ४३=१४६२ | १७७६ |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत आहेत असे गृहित धरुन सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक :- १७-०२-२०२२

सही/-
ॲड. सुनिल के. वाडके
डी-१, तळमजला,
हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी.
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड मोबा. नं. ९८६७७१५५२४

## जाहिर नोटीस

अर्जदाराचे वकील -ॲड.संस्कृती शिंदे
फौ.चौकशी अर्ज नं.४०/२०२२

**माणगांव येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात,**

मुसररत मोहम्मद हुसैन गालसुलकर ....अर्जदार

विरुद्ध
मा.मुख्याधिकारी,
नगरपंचायत माणगांव, वगैरे, २ ....सामनेवाला

ज्या अर्थी अर्जदार हिने तिचा मुलगा महजर मोहम्मद हुसैन गालसुलकर याचा जन्म दिनांक २१/१२/१९९२ रोजी मौजे माणगांव, ता.माणगाव,जि. रायगड येथे झाला असल्याबाबत जन्म दाखला मिळण्याकरिता जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी ज्या कोणाची अर्जदार हिस मुलगा महजर मोहम्मद हुसैन गालसुलकर याचा जन्म दाखला देण्यास हरकत असेल अगर त्याचे जन्माची नोंद ग्रामपंचायत दप्तरी होणेंस हरकत असेल त्यांनी स्वतः हजर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत दिनांक २५/३/२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता कोर्टात उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे. उक्त दिवशी व उक्त वेळी म्हणणे न मांडल्यास पुढील योग्य ते आदेश करण्यात येतील याची नोंद घ्यावी. करिता माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी जाहीरनामा प्रसिद्ध केला.

दिनांकः१६/०२/२०२२

सही/- **कनिष्ठ लिपिक** दिवाणी न्यायालय क.स्तर माणगाव ता.माणगाव जि.रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/- **सहाय्यक अधिक्षक,** दिवाणी न्यायालय क.स्तर माणगावत ता.माणगाव जि.रायगड

## जाहीर नोटीस
### तहसीलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात

कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम कलम ३२ ग पोट-कलम (१) वा अन्वये द्यावयाची नोटीस ३२ ग दावा क्र.४०/२०२१

प्रति,
१. श्रीम. निराबाई खंडु राऊत
२. श्री. विकास सखाराम बडेकर
३. श्री. विठोबा सखाराम बडेकर
४. श्रीम. विमल पुंडलिक दाभणे
५. श्रीम. हिराबाई जगन्नाथ सावंत,
रा. किरवली, ता. कर्जत, जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१.श्री. जेठमल नरसाची
रा. किरवली, ता. कर्जत, जि. रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- किरवली, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०९-१२-२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक २१-०२-२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसील कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे. सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमिन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत तहसील कर्जत, जि. रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| मौजे- किरवली ता.कर्जत, जि.रायगड | १९/४ | ०-५०-४० पैकी ०-०५-४० | ५-०६ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण :- कर्जत
**दिनांक : १६-०२-२०२२**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत**

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
### जाहीर आवाहन
### (घनकचरा व्यवस्थापन, दंड आकारणीबाबत)

या जाहीर सुचनेद्वारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एस.सी.ओ. १३५७ (इ) दिनांक ०८-०४-२०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम लागू केले आहेत या नियमांची अंमलबजावणी शहरामध्ये प्रभावीपणे चालू आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्तींना दंड आकारण्याचे (spot fine) अधिकार नगरपरिषदेकडे शासन निर्णय क्र. स्वमअ-२०१७/प्रा.क्र.२५६(१)/नवी-३४, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक ०७ सप्टेंबर २०१८ अन्वये प्रदान करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन या अलिबाग नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्तींकडून खालीप्रमाणे दंड आकारण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती/बाब | दंड रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | रस्ते मार्गावर घाण करणे | १५०/- |
| २ | सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १००/- |
| ३ | उघड्यावर लघवी करणे | १५०/- |
| ४ | उघड्यावर शौच करणे | २५०/- |
| ५ | मैला पाणी उघड्यावर/सार्वजनिक ठिकाणी सोडणे | ५,००० |
| ६ | घनकचरा वर्गीकृत न देणे | ५००/- |
| ७ | प्लास्टिक व थर्माकॉल (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) | प्रथम वेळेस ५,०००/- |
| | | द्वितीय वेळेस १०,०००/- |
| | | तृतीय वेळेस २५,०००/- व ३ महिने कारावास |
| ८ | C&D waste संकलन दर | १००/- प्रति टन |
| ९ | C&D waste सार्वजनिक ठिकाणी टाकणे | प्रथम वेळेस ५,०००/- |
| | | द्वितीय वेळेस १०,०००/- |

वरीलप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी किंवा सुचनांकरीता नगरपरिषद कार्यालयाच्या ९१५६८९६१२३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील : ॲड. सानिका कडिकर

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. १४/२०२२

१. श्रीमती शितल शांताराम वाईम, रा. घर क्र. १६२/अे सातिर्जे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
२.सौ. प्रविणा प्रविण सांडे, पुर्वाश्रमीची स्मिता शांताराम वाईम रा. सातिर्जे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
३. सौ. वैष्णवी विवेक भानसे, पुर्वाश्रमीची निता शांताराम वाईम रा. कणा-इंद्रपै, पो. सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड
४. सौ. साक्षी सुजित नाचणेकर पूर्वाश्रमीची निलीमा शांताराम वाईम रा. घर नं. ३१०, कुरकुंडी-कोलटेंभी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड
५. श्री. सुशांत शांताराम वाईम, रा. घर क्र. १६२/अे, सातिर्जे, पो. मापगाव,ता. अलिबाग, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कुणीही नाही .... — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, शांताराम गणपत वाईम हे असून त्यांचे दि. ४-०५-२०२१ मयत झाले आहेत. वरील अर्जदार हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

मयत शांताराम गणपत वाईम यांचे मालकीची मिनिडोअर रिक्षा नं. एमएच/०६/एस/६४८२ (इंजिन नं.D36030034), (चासीस नं. TO5177923K07) तसेच पॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल नं. एमएच/०६/बीसी/४९२०, (इंजिन नं. HA10ED-BGM73855), (चासीस नं. MBLHA10EWBGM76255) या वर्णनाची वाहने होती. मयत शांताराम गणपत वाईम यांचे पश्चात अर्जदार यांस मिळणेकरीता व अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे.

सबब, या जाहीर नोटीशीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, यांतील अर्जदार यांचे मागणीप्रमाणे ते मयत शांताराम गणपत वाईम यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस दाखला देण्यास अन्य कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांचे आत या मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल व तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७-०२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय, व.स्तर** **अलिबाग**

कोर्टाचा शिक्का

**सहाय्यक अधिक्षक,** **दिवाणी न्यायालय, व.स्तर** **अलिबाग**

## अपर तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण अलिबाग यांचे कोर्टात कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग, पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**नोटीस** दावा क्रमांक १३/२०२१

१. श्रीम. शकुंतला शंकर जोशी (मयत)
१/१. श्री. शेखर शंकर जोशी
१/२. श्रीम. अनिता अरुण भावे
१/३. श्री. सुहास वामन जोशी
सर्व रा.मु.पो.कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड — वादी/अर्जदार

**विरुद्ध**

१. श्री. प्रभाकर रामचंद्र घाडगे
२. श्री. प्रविण रामचंद्र घाडगे
३. श्रीम. प्रविणा रामचंद्र घाडगे
४. श्रीम. चंद्रभागा रामचंद्र घाडगे
५. श्रीम. धाकटी जानू घाडगे मयत यांचे वारस
६. श्री. सिताराम जानू घाडगे मयत यांचे वारस
६/१ श्रीम. सिताबाई सिताराम घाडगे
६/२ श्री. सुरेश सिताराम घाडगे
६/३ श्री. महेश सिताराम घाडगे
६/४ श्री. दिनेश सिताराम घाडगे
६/५ श्रीम. सुरेखा प्रल्हाद पाटील
७. श्री. रामचंद्र जानू घाडगे (मयत)
८. श्री. यशवंत जानू घाडगे मयत यांचे वारस
८/१ श्रीम. यश्वदा यशवंत घाडगे
८/२ श्री. सुधाकर यशवंत घाडगे
८/३ श्रीम. वैजयंती कमळाकर पिंगळे
९. श्री. विठ्ठल जानु घाडगे मयत यांचे वारस
९/१ श्रीम. रुक्मिणी विठ्ठल घाडगे
९/२ श्री. मधुकर विठ्ठल घाडगे
सर्व रा. कुरुळ, ता. अलिबाग, जि. रायगड — प्रतिवादी/सामनेवाले

**विषय :- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ फ प्रमाणे**

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | ग.नंबर/स.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे कुरुळ ता.अलिबाग | ५०/५ | ०-३८-०० | ३.९० |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त नमुद मिळकती बाबत मा. उपविभागीय अधिकारी उपविभाग पेण यांनी फरचौकशीकामी उक्त प्रकरण या न्यायालयात परत पाठविले आहे.

उक्त दाव्याची सुनावणी या न्यायालयात दि. १५-०३-२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित केली आहे. उक्त सुनावणीचे वेळी तहसील कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न राहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १७-०२-२०२२

सही/-
**(मीनल दळवी)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग-रायगड**

# टी-२० मध्ये भारताची विजयी सलामी

## विंडीजवर सहा गडी राखून मात; बिश्नोईची चमक

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

लेग-स्पिनर रवी बिश्नोईच्या (२/१७) पदार्पणातील प्रभावी माऱ्यानंतर रोहित शर्मा (१९ चेंडूंत ४० धावा) आणि सूर्यकुमार यादव (१८ चेंडूंत नाबाद ३४) या मुंबईकरांनी केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर भारताने बुधवारी पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजला सहा गडी आणि सात चेंडू राखून नमवले. या विजयासह तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे.

कोलकाता येथील ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या या सामन्यात पाहुण्या विंडीजने दिलेले १५८ धावांचे लक्ष्य भारताने १८.५ षटकांत गाठले. भारताचा कर्णधार रोहित शर्माने आक्रमक शैलीत फलंदाजी करत विंडीजच्या गोलंदाजांवर दडपण टाकले. त्याने १९ चेंडूंतच चार चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने ४० धावा फटकावल्या. त्याचा सलामीचा साथीदार इशान किशनला (४२ चेंडूंत ३५) मात्र धावांचा वेग राखण्यात अपयश आले. या दोघांनी ६४ धावांची सलामी दिल्यावर त्यांना फिरकीपटू रॉस्टन चेसने माघारी पाठवले. मग विराट कोहली (१७) आणि ऋषभ पंत (८) यांना खेळपट्टीवर फार काळ टिकाव धरता आला नाही. पण हे दोघे बाद



झाल्यावर सूर्यकुमार आणि डावखुरा वेंकटेश अय्यर (१३ चेंडूंत नाबाद २४) यांनी पाचव्या गड्यांसाठी ४८ धावांची अभेद्य भागीदारी रचत भारताला विजय मिळवून दिला.

तत्पूर्वी, विंडीजने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ बाद १५७ अशी धावसंख्या उभारली. त्यांचा सलामीवीर ब्रेंडन किंगला (४) भुवनेश्वर कुमारने पहिल्याच षटकात बाद केले. यानंतर कायले मेयर्स (२४ चेंडूंत ३१) आणि निकोलस पूरन (४३ चेंडूंत ६१) यांनी चांगली फलंदाजी करत विंडीजचा धावफलक हलता ठेवला. मेयर्सला चहलने बाद केले, तर चेस आणि रोव्हमन पॉवेल (२) यांना पदार्पणवीर बिश्नोईने एकाच षटकात माघारी धाडत विंडीजला अडचणीत टाकले. अखेर पूरनला कर्णधार किरॉन पोलार्डची (१९ चेंडूंत नाबाद २४) साथ लाभल्याने विंडीजला १५० धावांचा टप्पा पार करण्यात यश आले.

९ आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० पदार्पणात सामनावीराचा पुरस्कार पटकावणारा बिश्नोई हा भारताचा नववा खेळाडू ठरला. तसेच ही कामगिरी करणारा तो प्रज्ञान ओझा आणि अक्षर पटेल यांच्यानंतरचा तिसरा भारतीय फिरकीपटू आहे.

### संक्षिप्त धावफलक

वेस्ट इंडिज : २० षटकांत ७ बाद १५७ (निकोलस पूरन ६१, कायले मेयर्स ३१, किरॉन पोलार्ड नाबाद २४; रवी बिश्नोई २/१७, हर्षल पटेल २/३७) विजयी वि. भारत : षटकांत (रोहित शर्मा ४०, इशान किशन ३५, सूर्यकुमार यादव नाबाद ३४; रॉस्टन चेस २/१४)

### रोहित पंचांवरच भडकला

भारताने हा सामना जिंकला असला, तरी कॅप्टन रोहित शर्मा मैदानावरील पंचांच्या एका निर्णयावर नाराज झाला. सामन्याचं सातव षटक सुरु होतं. टी २० मध्ये भारतासाठी डेब्यु करणारा रवी बिश्नोई गोलंदाजी करत होता. समोर रॉस्टन चेस होता. बिश्नोईने त्याच्या पहिल्या षटकात तीन वाईड बॉल टाकले. रोहितने रिव्ह्यू घेतला नसता, तर तो चौथा वाईड बॉल ठरला असता. बिश्नोईने पहिल्या षटकातील पाचवा चेंडू गुगली टाकला. रॉस्टनने लेग साईडला चेंडू मारण्याचा प्रयत्न केला. पण चेंडू पॅडला लागून विकेटकिपर पंतच्या ग्लोव्हजमध्ये गेला. आवाज झाल्यामुळे बिश्नोईने झेलबादचे अपील केले. पण पंचांनी वाईड बॉल दिला. त्यावर रोहितने 'वाईड बॉल कुठे देतो यार' असं म्हटलं. रोहित पंचांच्या या निर्णयावर वैतागल्याचं स्पष्ट दिसत होतं.

### रविवारचा सामना प्रेक्षकांसाठी खुला

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील तीन टी २० सामन्यांची मालिका कोलकात्याच्या इडन गार्डनवर रंगणार आहे. दरम्यान, बीसीसीआयने रविवारी होणाऱ्या तिसऱ्या टी २० सामन्यात प्रेक्षकांना प्रवेश देण्याची परवानगी बंगाल क्रिकेट असोसिएशनला दिली आहे. क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालने बीसीसीआयकडे इडन गार्डनच्या सगळ्या प्रेक्षक गॅलरींच्या अप्पर ब्लॉक स्टँडमध्ये चाहत्यांना प्रवेश देण्याची परवानगी मागितली होती. बीसीसीआयने क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगालची ही विनंती बीसीसीआयने तिसऱ्या टी २० सामन्यासाठी मान्य केली आहे. बंगाल क्रिकेट बोर्डाचे प्रमुख अविषेक दालमिया यांनी सांगितले की, गांगुलीने इतर पदाधिकाऱ्यांबरोबर चर्चा केल्यानंतर सामन्यात प्रेक्षकांसाठी इडन गार्डनची दारे उघडण्याची तुम्हाला परवानगी देत आहोत. असा मेल केला आहे.

म ह त्वा चे

मराठी राजभाषा दिनानिमित्त

### दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुंबई वृत्तपत्र लेखक संघ आणि केदारनाथ विद्या प्रसारिणी संचालित ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा दिनानिमित्ताने कुर्ला, मुंबई येथे दिवाळी अंक प्रदर्शन व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून स्पर्धे करिता इच्छूकांनी एक दिवाळी अंक टपाल किंवा कुरिअर द्वारा श्री.संजय साळगांवकर,श्रीराम सोसायटी,विंग सी.१,रुम नं.१० ,पहिला मजला, कामगार नगर, कुर्ला पूर्व, मुंबई-४०००२४, संपर्क : ९७०२२४८२७५, ई-मेल- savlispmgmail.com या पत्त्यावर बुधवार दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८.०० वा.पर्यंत पाठवावेत. या कार्यक्रमाचे उदघाटक व प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार मंगेश कुडाळकर आणि केदारनाथ विद्या प्रसारिणी संचालित ग्रंथालय पदाधिकारी, संघाचे खजिनदार डॉ. सुभाष सोनंदकर आदी. मान्यवर उपस्थित राहणार असून समारंभाचे अध्यक्ष ड.सुनिल चंद्रकांत सुमती कदम आहेत. दिवाळी अंक निवड समिती डॉ.खंडु रघुनाथ माळवे (साहित्यिक), संघाचे उपाध्यक्ष व निवड समिती सदस्य जगन्नाथ काशिनाथ पवार, संघाचे महिला सभासद व निवड समिती सदस्या करुणा संजय बारीया आणि निलम सुरेश पाटील आहेत.

### चॅम्पियन्स लीग फुटबॉल

### एम्बापेच्या गोलमुळे सेंट-जर्मेनची सरशी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अखेरच्या मिनिटाला आघाडीपटू किलियान एम्बापेने केलेल्या गोलमुळे पॅरिस सेंट-जर्मेनने युएफा चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या उपउपांत्यपूर्व फेरीच्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात रेयाल माद्रिदवर १-० अशी सरशी साधली.

सेंट-जर्मेनच्या घरच्या मैदानावर झालेल्या या सामन्याच्या पूर्वार्धात गोलशून्य बरोबरी होती. उत्तरार्धात सेंट-जर्मेनने अधिक आक्रमक खेळ केला आणि त्यांना ६०व्या मिनिटाला पेनल्टीदेखील मिळाली. मात्र लिओनेल मेसीने मारलेला फटका रेयालचा गोलरक्षक थिबो कोर्टवाने अडवला. अखेर सामना गोलशून्य बरोबरीतच संपणार असे वाटत असताना ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत नेयमारच्या पासवर एम्बापेने गोल करत सेंट-जर्मेनला १-० असा विजय मिळवून दिला. अन्य सामन्यात, गतउपविजेत्या मँचेस्टर सिटीने स्पोर्टिंग लिस्बनला ५-० असे पराभूत केले. त्यांच्याकडून बर्नाडरे सिल्वाने (१७ आणि ४४ वे मिनिट) दोन, तर रियाद महारेझ (७), फिल फोडेन (३२ वे मि.), रहीम स्टर्लिंग (५८वे मि.) यांनी प्रत्येकी एक गोल केला. उपउपांत्यपूर्व फेरीच्या या दोन्ही लढतींचे दुसऱ्या टप्प्यातील सामने १० मार्चला खेळवले जातील.

### वेलकम शिखर धवन
### प्रिती झिंटाने केले स्वागत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल फ्रँचायझी पंजाब किंग्ज संघानं मेगा लिलावात शिखर धवनला ८.२५ कोटी मोजून आपल्या ताफ्यात सामील करुन घेतलं होते. हो धवन आमच्यात आला. त्याला संघात घेण्यासाठी आम्ही सुरुवातीपासून प्रयत्नशील होतो, अशा शब्दांत पंजाबच्या मालकीण प्रिती झिंटा हिने धवनच वेलकम केले आहे.

गत हंगामा लोकेश राहुल पंजाब किंग्ज संघाचे नेतृत्व करताना दिसला होता. मात्र या हंगामानंतर



त्याने संघ सोडण्याचा निर्णय घेतला. त्याच्यानंतर पंजाबचा पुढचा कर्णधार कोण अशी चर्चा रंगली होती. पंजाबने मयांक अग्रवालला १२ कोटी मोजून रिटेन केलं आहे. लोकेश राहुलच्या अनुपस्थितीत त्यानेअनेकसामन्यातकर्णधारपदाची धूराही सांभाळली आहे. पण अनुभवाच्या जोरावर ८ कोटीचा धवन १२ कोटीच्या गड्यावर भारी पडणार असल्याचे दिसते. प्रसारमाध्यमातील वृत्तानुसार, शिखर धवनला कर्णधार करायचं हे पंजाबनं पक्क ठरवलं आहे. आता त्याची केवळ औपचारिकता बाकी आहे. शिखर धवन याने दिल्ली कॅपिटल्सकडून दमदार कामगिरी केली होती. २०१९ मध्ये तो दिल्ली कॅपिटल्सच्या ताफ्यात जॉईन झाला. दिल्लीकडून खेळताना तिन्ही हंगामात त्याने ५०० हून अधिक धावा केल्या आहेत.

### आशिया सांघिक बॅडमिंटन स्पर्धा
### भारतीय महिला संघाची हार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या महिला संघाने आशिया सांघिक अजिंक्यपद बॅडिमटन स्पर्धेच्या पहिल्याच लढतीत बुधवारी यजमान मलेशियाकडून २-३ अशा फरकाने पराभव पत्करला.

अश्मिता चलिहा आणि तारा शाह यांनी एकेरीत दिमाखदार विजय संपादन केले; परंतु दोन अनुभवी दुहेरीच्या जोड्यांना आपली छाप पाडता आली नाही. दुखापतीमुळे अखेरच्या क्षणी मालविका बनसोडने माघार घेतल्यामुळे तिच्या जागी आकर्षी कश्यपला संधी मिळाली; परंतु किसोना सेल्व्हादुरायकडून १६-२१, २१-१८, १६-२१ असा तिने पराभव पत्करला.

व्हॅलेरी सिओ आणि पर्ली टॅन जोडीने खुशी गुप्ता आणि मेहरीन रिझा जोडीला २१-१, २१-६ असे नामोहरम केल्याने मलेशियाला २-० अशी आघाडी मिळाली. अश्मिताने सिटी नुरशुहैनीला २१-११, २१-१९ असे नमवले.

मग अ‍ॅना शिंग यिक शेआँग आणि तेओ मेई शिंग जोडीने अरुल बोला राधाकृष्णन आणि निला व्हॅलूवान जोडीला २१-१०, २१-१२ असे हरवून ३-१ अशी आश्वासक आघाडी मिळवली. अखेरच्या लढतीत ताराने माइशा खैरूलवर २१-१६, २१-१५ असा विजय मिळवला. आता भारतीय महिला संघाची शुक्रवारी गतविजेत्या जपानशी गाठ पडणार आहे.

### क्रिकेटमध्येही आता रेड कार्डचा वापर

**। ऑकलंड । वृत्तसंस्था ।**

नियमाचं उल्लंघन केल्याने अंपायर बिली बाऊडेन यांनी नाराजी व्यक्त करत आपल्या मागच्या खिशातून रेड कार्ड काढले आणि मॅग्राला दाखवले. अशा प्रकारची पहिलीच घटना क्रिकेट जगतात घडली.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्यात हा सामना ऑकलंड येथे रंगला होता. या सामन्यात तगड्या ऑस्ट्रेलियाने २० षटकात २१४ धावा चोपल्या होत्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडने देखील १७० धावांपर्यंत मजल मारली. या सामन्यात रिकी पाँटिंगने ५५ चेंडूत ९८ धावांची नाबाद खेळी केली होती. मात्र

**॥ ऑस्ट्रेलिया -न्यूझीलंड सामन्यातील घटना**

**॥ गोलंदाज मॅग्राकडून नियमांचे उल्लंघन**

त्याच्या खेळीपेक्षा अंपायर बिली बाऊडेन यांनी ग्लेन मॅग्राला दाखवलेल्या रेड कार्डचीच चर्चा जास्त झाली.

त्याचं झालं असं की ग्लेन मॅग्राने कायल मिल्सला अंडर आर्म चेंडू टाकला. मात्र हा चेंडू टाकण्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा कर्णधार रिकी पाँटिंग आणि अंपायर यांच्यात एक दीर्घ चर्चा झाली होती. त्यानंतर दिग्गज गोलंदाज ग्लेन मॅग्राने हळूवारपणे न्यूझीलंडच्या फलंदाजाकडे अंडर आर्म चेंडू फेकला. जरी क्रिकेटमध्ये फुटबॉल सारखे रेड, यलो कार्ड दाखवण्याची पद्धत नसली तरी या घटनेची आंतरराष्ट्रीय क्रिकेट इतिहातील पहिले रेड कार्ड म्हणून अशी मजेशीर नोंद झाली. क्रिकेटमध्ये रेड कार्डची पद्धत नाही.

मात्र २००४-२००५ च्या सुमारास इंग्लंडच्या स्थानिक क्रिकेट सामन्यात ही पद्धत प्रायोगिक तत्वावर राबवण्यात आली होती. मात्र त्यानंतर ही पद्धत क्रिकेट सामन्यात वापरण्यात आलेली नाही.

### डे-नाईट क्रिकेट स्पर्धेत
## गोल्डन स्टार विजयी

**। माथेरान । वार्ताहर ।**

प्रसाद सावंत मित्र परिवार आणि गोल्डन स्टार आयोजित डे-नाईट क्रिकेट स्पर्धेचा अंतिम विजेता मानकरी ठरला. गोल्डन स्टार क्रिकेट संघ या संघाने फायनल मध्ये बंड्या बॉईज संघाचा पराभव करून पुन्हा एकदा या ट्रॉफीचा मानकरी होण्याचा सन्मान मिळविला आहे.

गोल्डन स्टार आयोजित डे-नाईट क्रिकेट स्पर्धेचे यंदाचे सातवे वर्ष असून या स्पर्धेचे आयोजन माथेरान येथील वीर हुतात्मा क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. स्पर्धा पाहण्यासाठी



माथेरान मधील पुरुष, महिला आणि छोट्यांसह अनेक वयोवृद्ध मंडळींनीही हजेरी लावली होती. उपस्थित महिला आणि युवतींसाठी येथे लकी ड्रॉ स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण म्हणजे या स्पर्धेत खेळणाऱ्या प्रत्येक संघात दोन आयकॉन खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता.

या स्पर्धेत एकूण १७ संघांनी प्रवेश घेतला होता. फायनलमध्ये गोल्डन स्टार विरुद्ध बंड्या बॉईज असा सामना रंगला होता. यात गोल्डन स्टार या संघाने बंड्या बॉईज या संघाचा पराभव करून पुन्हा एकदा या ट्रॉफीचा मानकरी होण्याचा सन्मान पटकावला. डे-नाईट क्रिकेट ट्रॉफीचा मानकरी गोल्डन स्टार क्रिकेट संघ ठरला असून माथेरानच्या माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि या स्पर्धेचे आयोजक प्रसाद सावंत यांच्या हस्ते या संघाला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## कर्जत रेल्वे स्थानकातील फलाटाची उंची वाढणार

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीनची उंची वाढविण्यात यावी अशी मागणी प्रवासी वर्गाकडून सातत्याने होत होती. याबाबतीत सामाजिक कार्यकर्ते व रेल्वे प्रवाशांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणाऱ्या पंकज ओसवाल यांनी सातत्याने गेले दहा महिने पाठपुरावा केला. यावेळी प्रशासनाने तारीख पे तारीख देऊन काम केले नाही. त्यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आणि आता फलाट तीनची उंची वाढविण्याचे काम सुरू केले आहे.

कर्जत रेल्वे स्थानकात एकूण तीन फलाट व ईएमयु फलाट आहे परंतु फलाट क्रमांक तीन वरची उंची कमी असल्यामुळे लोकल किंवा एक्सप्रेस ट्रेनमध्ये चढतांना खूपच गैरसोय होत असे. फलाट आणि गाडीच्या



(छायाचित्र :संजय गायकवाड)

दरवाज्यामध्ये खूपच अंतर असल्याने एखादा प्रवासी दोघांच्या मध्ये अंतर असल्या कारणाने पडून जखमी होऊ शकतो. या बाबतीत प्रवाशी वर्गाने सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांच्याही बाब लक्षात आणून दिली. ओसवाल यांनी ८ एप्रिल २०२१ पासून पाठपुरावा सुरू केला. त्याची दखल घेत १९ एप्रिल २०२१ रोजी रेल्वे प्रशासनाने त्यांना कर्जत येथील फलाट क्रमांक तीन वरील उंची वाढविण्याच्या बाबतीत कल्याण व लोणावळा येथील रेल्वे अधिकाऱ्यांनी कर्जत येथे येऊन फलाट क्रमांक तीनची पाहणी केली व त्यांना समस्येचे गांभीर्य लक्षात आले.

हे काम ३१ डिसेंबरमध्ये सुध्दा न झाल्याने पुन्हा पत्र व्यवहार केला असता सदर काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण होईल. असे रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना कळविले. मात्र आता सदर कामाला रेल्वे प्रशासनाने सुरुवात केली आहे.

### प्रो कबड्डीची फायनल २५ फेब्रुवारीला

**। मुंबई । प्रतिनिधी ।** प्रो कबड्डी लीगच्या आठव्या हंगामाचा अंतिम सामना २५ फेब्रुवारीला होणार असून, त्याआधी २१ आणि २३ फेब्रुवारीला 'प्ले-ऑफ' म्हणजेच बाद फेरीचे दोन टप्पे पार पडणार आहेत, असे संयोजक मशाल स्पोर्टस्‌कडून बुधवारी जाहीर करण्यात आले.

## मोकल यांना क्रीडारत्न पुरस्कार

**। मुंबई। प्रतिनिधी ।**

मनुष्यबळ विकास लोकसेवा ॲकॅडमीतर्फे प्राचार्य दीपक मोकल यांना राष्ट्रीय क्रीडारत्न पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. दादर येथे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी साहित्यिक रमेश आव्हाड, इंटरनॅशनल एज्युकेशन आयकॉन हेमांगी जोशी व इंटरनॅशनल सोसियल वर्कर डॉ. जे.सानिपिना यांच्या हस्ते मोकल यांना राष्ट्रीय क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्याप्रित्यर्थ डायरेक्ट व्हॉलीबॉल असो.चे अध्यक्ष प्रा.डी. बी.साळुंके, राष्ट्रीय अध्यक्ष विपीन चहल, राष्ट्रीय सरचिटणीस विक्रमसिंग, राज्य व राष्ट्रीय असो.चे सर्व पदाधिकारी, सदस्य, तसेच सर्व जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी, सदस्य यांनी अभिनंदन केले आहे.






### सोशल मीडियावर 'दृश्यम २' चित्रपटाची उत्सुकता

**। वर्षा मेहता।**
**। अलिबाग ।**

बॉलीवूड स्टार अजय देवगणने गुरुवारी त्याच्या २०१५ मधील क्राईम थ्रिलर दृश्यमच्या सिक्वेलच्या शूटिंगला सुरुवात केली. दिवंगत चित्रपट निर्माते निशिकांत कामत यांनी दिग्दर्शित केलेला, दृश्यम हा त्याच नावाच्या मोहनलाल-स्टारर मल्याळम-भाषेतील चित्रपटाचा रिमेक होता, ज्याचा दुसरा चित्रपट ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये प्रदर्शित झाला होता.

अजय देवगण त्याच्या सिक्वेलमध्ये विजय साळगावकरची भूमिका पुन्हा साकारण्यासाठी सज्ज आहे, ज्यामध्ये पहिल्या चित्रपटाची स्टार कास्ट देखील दिसणार आहे - तब्बू, श्रिया सरन आणि इशिता दत्ता. अजय देवगणने त्याच्या सोशल



मीडिया अकाउंटवर लिहिले की तो दृश्यम २ सोबत एक मनोरंजक कथा सादर करण्यास आणि पुन्हा एकदा विजय साळगावकरची बहुआयामी व्यक्तिरेखा साकारण्यास उत्सुक आहे.

अनेकांनी सांगितले की, 'दृश्यम' हा चित्रपट आवडला होता. विजयच पात्र एक बहुआयामी पात्र आहे आणि तो ऑनस्क्रीन आकर्षक कथा तयार करतो. या चित्रपटासाठी अभिषेक पाठक (दिग्दर्शक) यांची नवीन दृष्टी आहे. येत्या काही महिन्यांत 'दृश्यम २' चे गोव्यात मोठ्या प्रमाणावर चित्रीकरण होणार आहे.

SOCIAL MEDIA पडसाद

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)